नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १९७ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शुक्रवार, दि. २६ जून २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## ४४०० फोन कॉल्स, सिक्रेट मिटिंग

### सिया गोयल आणि तिच्या प्रियकराने कसा आखला केतन अग्रवालच्या हत्येचा कट?



पुणे : (स. गांवकरी)

केतन अग्रवाल या तरुणाची लोहगडावरुन ढकलून देत हत्या करण्यात आली. पुण्यातल्या या प्रकरणामुळे संपूर्ण पुणे जिल्हा आणि राज्य हादरलं आहे. सुरुवातीला हा अपघाती मृत्यू आहे असं वाटलं होतं. मात्र केतनच्या होणाऱ्या पत्नीने म्हणजेच सिया गोयलने तिचा बॉयफ्रेंड चेतन चौधरीसह संगनमत करुन हा कट आखला आणि केतनला ठार केलं असा आरोप आहे. या प्रकरणात आता विविध प्रकारचे खुलासे समोर येत आहेत. चेतन चौधरीच्या वडिलांनी माझा मुलगा निर्दोष आहे असा दावा केला आहे. तर आता चेतन आणि सिया हे दोघंही केतनची हत्या करण्यापूर्वी भेटले होते अशी माहिती समोर आली आहे तसंच दोघांमध्ये ४ हजार ४०० फोन कॉल्स झाल्याचंही समोर आलंय.

सिया गोयल आणि चेतन चौधरी यांच्यात ४ हजार ४०० फोन कॉल्स झाले होते. मागील सहा महिन्यात हे दोघं किती वेळा बोलले ही माहिती समोर आली आहे. फेब्रुवारी महिन्यात सिया गोयल आणि केतन अग्रवाल या दोघांचा साखरपुडा झाला होता. मात्र सियाला केतनशी लग्न करायचं नव्हतं. त्यामुळे तिने बॉयफ्रेंड चेतनला बरोबर घेतलं आणि केतनच्या हत्येचा क्रूर कट शिजवला. सिया आणि केतन या दोघांचे जे व्हिडीओ व्हायरल होत आहेत त्यात हे दोघंही खूप खुश दिसत आहेत. सियाकडे पाहून असं वाटतही नाही की तिने इतक्या थंड डोक्याने असा की भयंकर कट आखला असेल. सिया आणि केतन यांचं लग्न उदयपूर या ठिकाणी होणार होतं. त्यासाठी जवळपास १६ कोटी रुपयांचा खर्च करण्यात येणार होता. मात्र या सगळ्या गोष्टी घडण्यापूर्वीच सियाने केतनला मार्गातून हटवलं असा आरोप तिच्यावर आहे. सिया आणि तिचा बॉयफ्रेंड चेतन चौधरी यांच्यात मागील सहा महिन्यात एकूण ४ हजार ४०० फोन कॉल्स झाले आहेत. १८ जूनला केतनला लोहगडावरुन ढकलण्यात आलं. याबाबत पोलिसांनी माहिती दिल्याचं पीटीआयने म्हटलं आहे.

सिया आणि चेतन चौधरी केतनच्या हत्येच्या दिवशी म्हणजेच १८ जूनच्या दिवशी एका कॅफेमध्ये भेटले होते अशी माहिती पीटीआयने दिली आहे. केतनला लोहगडावरच्या कुठल्या ठिकाणाहून ढकललं गेलं पाहिजे म्हणजे त्याचा जीव जाईल याची चर्चा या दोघांमध्ये झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे असंही पीटीआयने त्यांच्या वृत्तात म्हटलं आहे.

#### केतन अग्रवालचा पासपोर्ट हरवला

केतन अग्रवाल आणि सिया गोयल प्री वेडिंग शूटसाठी बालीला जाणार होते. १४ जून रोजी त्यांचं विमान होतं. पण विमानतळावर आल्यावर केतनचा पासपोर्ट सापडला नाही. पासपोर्ट कुठेतरी पडला असावा असं सिया म्हणाली. वास्तविक तिनेच तो लपवला होता आणि हरवल्याचा बनाव रचला होता अशी माहिती समोर आली. पासपोर्ट न सापडल्याने बालीची ट्रीप रद्द झाली.

## शिवीगाळ केल्याप्रकरणी खासदार संजय दिना पाटलांची दिलगिरी

मुंबई : (स. गांवकरी)



शिवसेना (ठाकरे) पक्षातून फुटून काही दिवसांपूर्वी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केलेले खासदार संजय दिना पाटील यांनी आज (२५ जून) पत्रकारांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केल्याचा आरोप करण्यात आला होता. या संदर्भातील संजय दिना पाटील यांचा एक व्हिडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. त्यानंतर राज्यभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटल्या होत्या. पत्रकारांना शिवीगाळ केल्याप्रकरणी अखेर आता खासदार संजय दिना पाटील यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. 'माझ्यामध्ये आणि पत्रकारांमध्ये जो काही प्रकार झाला, त्याबाबत मी मनापासून दिलगिरी व्यक्त करत आहे', अशा शब्दांत खासदार संजय दिना पाटील यांनी माफी मागितली आहे. या संदर्भात संजय दिना पाटील यांनी एक्सवर (ट्विटर) व्हिडीओ शेअर केला आहे. "पत्रकार आणि माझ्यामध्ये जो प्रकार घडला, त्याबाबत मी मनापासून दिलगिरी व्यक्त करतो. हा प्रकार नेमकं का घडला? याबाबतही सांगतो. ज्या दिवसापासून मी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला, त्या दिवसापासून अतिशय वाईट शब्दांत आणि शिवीगाळ करून माझा अपमान केला गेला. तरीही मी सर्व अपमान सहन केला. त्यानंतर आज सकाळी माझे काही पत्रकार मित्र आले, तेव्हा मी त्यांना हात जोडून विनंती केली की मला याबाबत काहीही विचारू नका. मला जे बोलायचं होतं, ते बोलून झालं आहे. आता मला कृपा करून काही विचारू नका. मी त्यांना हात जोडून विनंती केली. मला आणि माझ्या परिवाराला जे शिव्या देत आहेत, त्यांना लांब ठेवा, असं मी पत्रकारांना सांगितलं. मात्र, तरीही पत्रकार मला त्याच गोष्टीवर विचारण्यासाठी आले होते. तेव्हा माझ्यामध्ये आणि पत्रकारांमध्ये काही वाद झाला. त्यामध्ये माझ्याकडून चुकीने काही अपशब्द निघाले, त्यासाठी मी त्या सर्व पत्रकारांची आणि पत्रकार समुहाची दिलगिरी व्यक्त करतो", अशा शब्दांत संजय दिना पाटील यांनी जाहीर माफी मागितली आहे.

## थोडक्यात...

### रायगडकरांना दिलासा

अलिबाग (स. गांवकरी) : रायगड जिल्ह्यात मागील दोन तीन दिवसांपासून सुरू असलेल्या दमदार पावसामुळे जिल्ह्यातील धरणांमधील पाणीसाठ्यात हळूहळू वाढ होत असून जलस्थितीत सुधारणा दिसून येत आहे. मागील आठवड्यात अवघ्या १३ टक्क्यांपर्यंत घसरलेला पाणीसाठा आता वाढून १८.८२ टक्क्यांवर पोहोचला आहे. त्यामुळे नागरिकांसह शेतकरी वर्गालाही मोठा दिलासा मिळाला आहे. यंदाच्या मान्सूनच्या सुरुवातीच्या काळात पावसाने अपेक्षित हजेरी लावली नव्हती. जून महिन्याच्या पहिल्या तीन आठवड्यांत अनेक भागांत पावसाचा खंड पडल्याने धरणांमधील पाणीसाठा समाधानकारक वाढू शकला नव्हता. परिणामी पिण्याचे पाणी, शेती आणि औद्योगिक वापरासाठी आवश्यक जलसाठ्याबाबत चिंता व्यक्त केली जात होती. काही धरणांमधील साठा झपाट्याने कमी झाल्याने प्रशासनही परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून होते.

### महिलांना आता शेतकऱ्यांचा दर्जा

मुंबई (स. गांवकरी) : राज्यातील महिला शेतकऱ्यांना समान हक्क आणि लाभ मिळवून देण्यासाठी महिला शेतकरी सक्षमीकर कायदा करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मंत्रिमंडळ बैठकीत या विधेयकाचा मसूद्याला मान्यता देण्यात आली असून त्यात महिलांना शेतकरी म्हणून मान्यता देण्यात आली असून त्यांच्या सबलीकरणासाठी विशेष निधी स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ग्रामीण भागातील बहुतांश महिला कृषी व तत्सम क्षेत्रात कार्यरत आहेत. तसेच राज्यात जमिनीची अधिकारता असलेल्या माहिला शेतकऱ्यांची संख्या अत्यल्प असून सरकारच्या कृषी धोरणे व योजनांचा व्यावहारिक कल पुरुषकेंद्रीत असल्याने तसेच बहुतांश योजनांसाठी जमीन मालकी हक्क अनिवार्य असल्याने महिलांना त्याचा लाभ होत नाही. त्याचप्रमाणे राज्यातील भूमिहीन तसेच मत्स्यव्यवसाय, पशूसंवर्धन, कुक्कुटपालन, वनोपज संकलन यात काम करणाऱ्या महिलांना शेतकरी दर्जा नसल्याने त्या सरकारच्या योजनांपासून वंचित राहत आहेत.

## राज्यात हजारो कोटींचा मुद्रांक घोटाळा, चौकशी होणार

मुंबई : (स. गांवकरी)



अनधिकृत इमारतींची बेकायदा नोंदणी करून शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविण्यात आल्याचे धक्कादायक प्रकरण उघडकीस आले आहे. नवी मुंबईतील शेकडो इमारतींची बोगस नोंदणी करून सरकारचा १३ कोटी ९१ लाख रुपयांचा महसूल बुडविणाऱ्या ठाणे दुय्यम निबंधक कार्यालयातील वरिष्ठ लिपिक आर.बी. दहिफळे यांच्यावर कठोर कारवाई करण्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत केली. राज्यात अनाधिकृत बांधकामांची नोंदणी करताना काही ठराविक विकासकांना हाताशी धरून मुद्रांक निश्चिती करताना मोठ्या प्रमाणात फेरफार केला जात असून यातून सरकारचे दहा ते वीस हजार कोटी रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली. या प्रकरणाची व्याप्ती पाहता देशाचे महालेखापरिक्षक यांच्या माध्यमातून विशेष चौकशी पथके स्थापन करून संपूर्ण राज्यात १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२६ दरम्यान झालेल्या सर्व दस्त नोंदणीची शहानिशा करण्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. विधानसभेत नवी मुंबईत अनाधिकृत इमारतीधील दस्ताची बेकायदा नोंदणी करून राज्य सरकारचा कोट्यावधी रुपयांचा महसूल घडविल्याबद्दल जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावरील चर्चेदरम्यान बावनकुळे यांनी ही महत्त्वपूर्ण घोषणा केली. नवी मुंबईतील ८०० दस्तांची केवळ १० दिवसात बेकायदा नोंदणी करून सरकारचा १३ कोटी ९१ लाख रुपयांचे मुद्रांक शुल्क बुडविल्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## MPSC परीक्षा पध्दतीत ऐतिहासिक बदल!

### पूर्व परीक्षा वर्षातून २ वेळा, ऑनलाईन होणार

मुंबई : (स. गांवकरी)




महाराष्ट्रातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या लाखो उमेदवारांसाठी अत्यंत मोठी आणि दिलासादायक बातमी आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने परीक्षा पद्धतीत आतापर्यंतचा सर्वात क्रांतीकारी आणि ऐतिहासिक बदल जाहीर केला आहे. सन २०२७ पासून 'राज्य सेवा, गट-ब आणि गट-क' या महत्त्वाच्या पूर्व परीक्षा वर्षातून दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळा आयोजित केल्या जाणार आहेत.

स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांवरील अनावश्यक ताण कमी करण्यासाठी आणि त्यांना यशाच्या अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी आयोगाने हा निर्णय घेतला आहे. या नव्या रचनेनुसार, आता पारंपरिक ओएमआर शीट म्हणजेच पेन-पेपर पद्धतीऐवजी संगणकावर आधारित ऑनलाईन परीक्षा घेतली जाणार आहे. परीक्षा नियंत्रक सरिता बांदेकर-देशमुख यांनी या महत्त्वपूर्ण निर्णयाची घोषणा करत, पूर्व परीक्षांची वारंवारता वाढणार असली तरी मुख्य परीक्षा मात्र वर्षातून एकदाच घेतली जाईल, असे स्पष्ट केले आहे.

सध्याच्या प्रचलित पद्धतीनुसार, महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ व गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा, महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा पूर्व परीक्षा आणि महाराष्ट्र गट-क सेवा पूर्व परीक्षा या तिन्ही परीक्षा वर्षातून केवळ एकदाच घेतल्या जातात. या परीक्षांना दरवर्षी लाखो उमेदवार बसतात. मात्र, जागांच्या मर्यादित संख्येमुळे बहुतांश उमेदवारांना मुख्य परीक्षेची पात्रता मिळवता येत नाही. वर्षानुवर्षे अहोरात्र अभ्यास करूनही संपूर्ण भवितव्य केवळ एका दिवसाच्या एकाच संधीवर अवलंबून असल्याने विद्यार्थ्यांवर प्रचंड मानसिक दडपण येत असे. अपयश आल्यास पुन्हा पूर्ण वर्ष वाट पाहावी लागत होती. उमेदवारांना जास्तीच्या संधी उपलब्ध करून देऊन हा अनावश्यक ताण दूर करणे, हाच या ऐतिहासिक निर्णयामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोगाने आपल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. परीक्षा आता ओएमआर ऐवजी संगणकावर : नव्या नियमांनुसार आगामी पूर्व परीक्षा पारंपरिक कागद-पेन ऐवजी 'कंप्युटर बेस्ड टेस्ट' (CBT) म्हणजेच ऑनलाईन पद्धतीने संगणकावर घेतल्या जातील. यामुळे परीक्षा प्रक्रियेत अधिक पारदर्शकता येईल आणि निकालही गतीने जाहीर करणे शक्य होईल.

गुणांचे समानीकरण: परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये (Multiple Sessions) घेतली जाण्याची शक्यता लक्षात घेऊन, सर्व सत्रांमधील प्रश्नपत्रिकांच्या काठिण्यपातळीत समानता राखण्यासाठी आयोगाने 'नॉर्मलायझेशन' (गुणांचे समानीकरण) पद्धत लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे तांत्रिक नुकसान होणार नाही.



# आदिवासी जमिनीच्या हक्कासाठी तहसीलसमोर उपोषण

## ढवळपुरीतील जमीनधारकांचा सतलोक आश्रमाविरोधात कारवाईचा आग्रह; मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन कायम

पारनेर : (स. गांवकरी)

ढवळपुरी येथील आदिवासी जमिनीवरील कथित अतिक्रमण, बेकायदेशीर बांधकाम आणि जमीन बळकावल्याच्या आरोपांविरोधात अन्यायग्रस्त आदिवासी कुटुंबांनी गुरुवार (दि. २५ जून) पासून पारनेर तहसील कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणास सुरुवात केली आहे. आदिवासींच्या मालकीच्या जमिनीवरील कथित अतिक्रमण हटवून जमीन मूळ मालकांच्या ताब्यात द्यावी आणि संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

महादु तुकाराम पवार, दशरथ भाऊ केदार, खेवजी भिमा चिकणे, सुनिल उमाजी केदार, लिलाबाई सोमनाथ केवाळे, हिरामण नागु केदार आणि आनंदा दगडू



केदार हे आदिवासी जमीनधारक उपोषणात सहभागी झाले आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, ढवळपुरी येथील गट क्रमांक ११२०/२/१ ते ७ मधील सुमारे ४६ एकर आदिवासी जमिनीवर मुनिंदर धर्मार्थ ट्रस्ट (सतलोक आश्रम) यांच्या माध्यमातून कथितरित्या अतिक्रमण करून मोठ्या प्रमाणावर बांधकाम करण्यात आले आहे. त्यामुळे अनेक आदिवासी कुटुंबांना त्यांच्या हक्काच्या जमिनीपासून वंचित राहावे लागत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

उपोषणकर्त्यांनी संबंधित बांधकामासाठी आवश्यक शासकीय परवानग्या घेण्यात आल्या होत्या का, याची सखोल चौकशी करण्याची

> ढवळपुरीतील आदिवासी बांधवांच्या जमिनीचा प्रश्न हा केवळ जमिनीचा नाही, तर त्यांच्या अस्तित्वाचा आणि हक्काचा प्रश्न आहे. अनेक वर्षांपासून न्यायासाठी संघर्ष करूनही प्रशासनाने ठोस भूमिका घेतलेली नाही. त्यामुळे आदिवासी बांधवांना आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागला आहे. आदिवासींच्या जमिनीवरील कथित अतिक्रमण हटवून जमीन मूळ मालकांच्या ताब्यात देईपर्यंत आणि दोषींवर कारवाई होईपर्यंत हा लढा सुरूच राहील.
> – लहू मधे (जिल्हाध्यक्ष, क्रांतिकारी राया ठाकर फाउंडेशन)

मागणी केली आहे. तसेच संबंधित ठिकाणी सुरू असलेले धार्मिक कार्यक्रम तात्काळ बंद करून संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, असेही त्यांनी म्हटले आहे. यावेळी एकलव्य सेनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर अहिरे, राया ठाकर फाउंडेशनचे जिल्हाध्यक्ष लहू मधे, सह्याद्री आदिवासी ठाकर संघटनेचे जिल्हा सचिव संजय पथवे, आदिवासी क्रांतिकारक राया ठाकर समाजसेवा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष नामदेव जाधव रा या ठाकर फाउंडेशनचे जिल्हा सचिव पाराजी जाधव, वसंत वारे, सुनील चिकने, संदीप केदारी, मारुती केदार, दिलीप केदार, संजय केवाळे, प्रवीण केदार, बाळासाहेब चिकणे, जानकु केदार, साहेबराव केदार, देवराम केदार, भाऊसाहेब केदार, दामू केदार, आनंदा केदार, हिरामण केदार, दशरथ केदार, सुनील केदार, लिलाबाई केवाळे, महादू पवार, सनी पारधी उपोषणस्थळी उपस्थित होते.

## सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती वाढीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन

पारनेर : (स. गांवकरी)

राज्यातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा प्रश्न पावसाळी अधिवेशनात प्रभावीपणे मांडत पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सरांनी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेतील लाभार्थी विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या अपुऱ्या शिष्यवृत्तीबाबत सरकारचे लक्ष वेधले. या प्रश्नावर उत्तर देताना सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी शिष्यवृत्तीच्या रकमेत महागाई निर्देशांकानुसार वाढ करण्याचा विषय शासनाच्या विचाराधीन असल्याची महत्त्वपूर्ण माहिती सभागृहात दिली. आमदार दाते यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीमध्ये राज्यातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांचा पट वाढविण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेची सद्यस्थिती, प्रलंबित शिष्यवृत्ती आणि वाढत्या महागाईच्या



■ आमदार दातेंचा विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी आवाज

पार्श्वभूमीवर शिष्यवृत्ती वाढीची गरज यावर सविस्तर प्रश्न उपस्थित केले. त्यांनी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वितरणातील विलंब, निधीची उपलब्धता आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानाचा मुद्दाही सभागृहात मांडला.

यावर उत्तर देताना मंत्री संजय शिरसाट यांनी नागपूर जिल्ह्यासह विविध भागांतील पात्र विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती प्रकरणांची माहिती सभागृहासमोर ठेवली. विद्यार्थ्यांच्या खात्यात शिष्यवृत्ती जमा करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## रेशन दुकानदारांचे थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे गंभीर आरोप

### पेशकार मारोती पाटील यांच्या तात्काळ बदली व निलंबनाची रास्त भाव दुकानदार संघटनेची आक्रमक मागणी

बिलोली : (स. गांवकरी)

येथील तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाचे पेशकार मारोती पाटील यांच्याकडून रास्त भाव दुकानदारांची मोठ्या प्रमाणावर पिळवणूक, पैशांची बेकायदेशीर मागणी आणि मानसिक छळ केला जात असल्याचा खळबळजनक आरोप 'रास्त भाव दुकानदार संघटना, तालुका बिलोली' च्या वतीने करण्यात आला आहे. या संदर्भात संघटनेने थेट माननीय विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर, जिल्हाधिकारी नांदेड तहसीलदार बिलोली,यांना लेखी निवेदन देऊन पेशकार पाटील यांच्या तात्काळ निलंबनाची आणि बदलीची मागणी केली आहे.

प्रशासनाला दिलेल्या निवेद्रात दुकानदारांनी पेशकार मारोती पाटील यांच्या कामकाजावर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. निवेदनानुसार, पेशकार पाटील हे कोणत्याही अधिकृत शासकीय





कामासाठी, शासकीय नियमांचे उघड उल्लंघन करून दुकानदारांकडे उघडपणे पैशांची (लाचेची) मागणी करतात. पैसे न दिल्यास संबंधित दुकानदाराचे काम वेळेत न करणे, फाईल महिनोनमहिने अडवून ठेवणे आणि कामामध्ये जाणीवपूर्वक क्लिष्ट अडथळे निर्माण करून दुकानदारांना नाहक हेलपाटे मारायला लावणे हा त्यांचा नित्यक्रम बनला आहे. यामुळे प्रामाणिक दुकानदार पुरते हैराण झाले आहेत यांच्या या जाचक त्रासाला राशन दुकानदार कंटाळले असून पुरवठा विभागातून मारुती पाटील यांची हकालपट्टी करण्याची मागणी होत आहे.

केवळ स्वतःचा आर्थिक स्वार्थ साधण्यासाठी आणि दुकानदारांवर वचक ठेवण्यासाठी वादग्रस्त पेशकार पाटील यांनी एक वेगळेच मानसिक दबाव तंत्र सुरू केले आहे. "तुमच्या दुकानाची शासकीय चौकशी लावेन", "तुमचे दुकान कायमचे निलंबित करून परवाना कायमचा रद्द करेन" अशी थेट धमकी ते प्रत्येक भेटीत देतात. शासकीय अधिकारांचा असा बेकायदेशीर दुरुपयोग करून त्यांनी दुकानदारांमध्ये भीतीचे साम्राज्य निर्माण केले आहे. यामुळे अनेक दुकानदार प्रचंड मानसिक तणावाखाली वावरत असून त्यांच्या आरोग्यावर याचा अत्यंत विपरित परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, पेशकार मारोती पाटील यांचे वर्तन कोणत्याही सुसंस्कृत शासकीय कर्मचाऱ्याला शोभणारे नाही. कार्यालयात येणाऱ्या रास्त भाव दुकानदारांशी ते अत्यंत उद्धट, उर्मट आणि अहंकारयुक्त भाषेत बोलतात. जाहीरपणे दुकानदारांचा अपमान करणे, त्यांना हीन वागणूक देणे यामुळे प्रशासकीय शिस्तीचा बोजवारा उडाला आहे. "माझे वरिष्ठ स्तरावर संबंध आहेत, माझे कोणी काही करू शकत नाही" अशा अविर्भावात ते वागत असल्याने दुकानदारांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

## आश्रमशाळेमुळे भटकंती करणाऱ्या समाजाचा विकास

ढवळपुरी : (स. गांवकरी)

शिक्षण ही आजच्या काळातील अत्यावश्यक गरज असून प्रत्येकाने दर्जेदार शिक्षण घेऊन उच्च शिक्षित झाले पाहिजे असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सिनेट सदस्य डॉ. कृष्णा रघुनाथ भंडलकर यांनी ढवळपुरी येथे केले. यावेळी पुणे विद्यापीठ रसायनशास्त्र विभागाचे डॉ. अमोल तांबे, धन्वंतरी कला व विज्ञान महाविद्यालय ढवळपुरीचे प्राचार्य योगेश भुसारी, प्राथमिक आश्रमशाळेचे मुख्याध्यापक संदीप महांडुळे आदी उपस्थित होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत ढवळपुरी येथील धन्वंतरी कला व विज्ञान महाविद्यालयात तपासणीसाठी आले असता प्रा. डॉ. कृष्णा भंडलकर यांनी प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेला सदिच्छा भेट दिली. या भेटी दरम्यान त्यांनी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना मिळणारे शिक्षण व सोयी सुविधा यांची माहिती घेतली. ढवळपुरी आश्रमशाळेमुळे भटकंती करणाऱ्या



**प्रा. डॉ. कृष्णा भंडलकर**

समाजातील विद्यार्थ्यांचा झालेला विकास, विविध क्षेत्रात विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश याची माहिती घेतल्यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी बोलताना प्रा. डॉ. कृष्णा भंडलकर म्हणाले की, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे व ढवळपुरी सारख्या दुर्गम, आदिवासी भागातील विद्यार्थ्यांनी सुद्धा हे दुध प्राशन केले आहे. त्यामुळेच येथील अनेक विद्यार्थी आज उच्च क्षेत्रामध्ये कार्य करीत आहेत. या ठिकाणी असणाऱ्या दर्जेदार सुविधा व दिले जाणारे दर्जेदार शिक्षण हे गुणवत्तापूर्ण असल्यामुळे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात विविध क्षेत्रात नोकरीसाठी पात्र होत आहेत. ही भटकंती करणाऱ्या समाजासाठी आनंदाची बाब आहे. धन्वंतरी कला व विज्ञान महाविद्यालयामुळे ढवळपुरी सारख्या दुर्गम व आदिवासी भागातील मुलांना विशेषतः मुलींना दर्जेदार शिक्षण मिळत असून यातून ते विविध स्पर्धा परीक्षांसाठी पात्र होत आहेत.

यावेळी धन्वंतरी महाविद्यालयाचे प्राध्यापक व प्राथमिक, माध्यमिक आश्रमशाळेचे सर्व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक लतिफ राजे यांनी केले. याप्रसंगी प्रा. डॉ. कृष्णा भंडलकर यांचे हस्ते आश्रमशाळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

## अप्पर तहसील कार्यालय निर्मिती बाबत हरकती व सूचना कराव्यात

नेवासा : (स. गांवकरी)

उपरोक्त प्रस्तावित नवीन अपर तहसिल कार्यालय निर्मिती बाबत आणि क्षेत्रांच्या पुनर्रचनेबाबत नेवासा तालुक्यातील तसेच संबंधित क्षेत्रातील स्थानिक नागरिकांना, संस्थांना काही हरकती किंवा सूचना सादर करावयाच्या असल्यास त्यांनी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून सादर कराव्यात अशी माहिती तहसीलदार डॉ.संजय बिरादार यांनी दिली. सदर प्रस्तावा बाबतच्या हरकती व सूचना या जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांका पासून (पंधरा) दिवसांच्या आत म्हणजेच दिनांक ८ जुलै २०२६ पर्यंत किंवा त्या पूर्वी लेखी स्वरूपात सादर करणे आवश्यक आहे.लेखी हरकती सूचना तहसिल कार्यालय नेवासा येथे कार्यालयीन वेळेत समक्ष



सादर करता येतील (टपालशाखे मार्फत हरकती व सुचनांचे अर्जावर कार्यवाही होणार नाही) मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा विचार केला जाणार नाही.नागरिकांना त्यांच्या हरकती/सूचना स्पष्टकारणांसह व आवश्यक पुराव्यांसह (नकाशे किंवा साख्यिकीय माहिती असल्यास) सादर कराव्या लागतील. प्राप्त झालेल्या सर्वहरकती व सूचनांचे दैनंदिन संकलन व तपासणीकरून, स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सदर अहवाल मा जिल्हाधिकारी अहिल्यानगर व मा विभागीय आयुक्त नाशिक विभाग यांच्यामार्फत (महसूल व वनविभाग) यांच्याकडे मंजुरीसाठी विनाविलंब सादर केला जाईल अशी माहिती तहसीलदार डॉ.बिरादार यांनी दिली

## समर्थलॉ कॉलेजची यशस्वी निकालाची गौरवशाली परंपरा कायम

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

बेल्हे येथील समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ लॉ कॉलेजने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या विद्यापीठ परीक्षांमध्ये उज्वल यश संपादन करत आपल्या उत्कृष्ट निकालाच्या परंपरेत आणखी एका सुवर्णपानाची भर घातली आहे.विद्यार्थ्यांच्याअथक परिश्रम,प्राध्यापकांचे गुणवत्ता पूर्ण मार्गदर्शन आणि संस्थेची शैक्षणिक बांधिलकी यांचा सुंदर मिलाफ या यशातून अधोरेखित झाला आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुनील कवडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रथम वर्ष एलएलबीचा निकाल तब्बल ९८.२९ टक्के लागला आहे. या परीक्षेत निलेश हाडवळे (८.९२ एसजीपीए) यांनी प्रथम क्रमांक मिळविला असून स्वप्निल घोलप (७.८४) यांनी द्वितीय

■ विधी शिक्षणाच्या क्षेत्रात समर्थ लॉ कॉलेजचे दैदिप्यमान यश

तर रविता दांगट (७.७५) व प्रमिला वाघोले (७.७५) यांनी संयुक्त तृतीय क्रमांक पटकावला. प्रथम वर्ष बी.ए. एलएलबीचा निकाल शंभर टक्के लागला असून शामा मलिक (८.१३) व अक्षदा पोखरकर (८.१३) यांनी संयुक्त प्रथम क्रमांक मिळविला. विश्वजीत माने (८.००)व भावना पानसरे (८.००) यांनी संयुक्त द्वितीय,तर गौरी डुकरे (७.८८) यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला. द्वितीय वर्ष बी.ए. एलएलबीचा निकालही शंभर टक्के लागला असून श्रुति काढणे (८.३३)यांनी प्रथम, सिद्धी मोरे (८.२५) यांनी द्वितीय , सिद्धी शेलोट (८:१३) यांनी तृतीय क्रमांक मिळविला.

## अवैध वृक्षतोडीविरोधात मोठी कारवाई!

### २ ट्रॅक्टर, २ कट्टर मशीनसह २.७२ लाखांचा मुद्देमाल जप्त!

राजगुरूनगर : (स. गांवकरी)

खेड वनपरिक्षेत्र कार्यालयाच्या पथकाने अवैध वृक्षतोड व लाकूड वाहतुकीविरोधात धडक कारवाई करत दोन ट्रॅक्टर, दोन कट्टर मशीन व दोन जनरेटरसह सुमारे २ लाख ७२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. वनविभागाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, कोणतीही शासकीय परवानगी न घेता आंबा व इतर प्रजातींच्या लाकूड मालाची बेकायदेशीर वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार मोजे चार आळवाडी रस्त्यावर सापळा रचून ही कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान एचएमटी कंपनीचा



ट्रॉलीसह ट्रॅक्टर, न्यू हॉलंड कंपनीचा ट्रॉलीसह ट्रॅक्टर, दोन कट्टर मशीन आणि दोन जनरेटर जप्त करण्यात आले. प्राथमिक चौकशीत हा मुद्देमाल बबन शिंदे व हिशाराम गाव ठेकेकर (खबडवाडी, ता. खेड, जि. पुणे) यांच्याशी संबंधित असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सहाय्यक वनसंरक्षक अमृत शिंदे यांनी सांगितले की, आंबा व इतर लाकूड मालाची वाहतूक करण्यासाठी वन विभागाचा वृक्षतोड व वाहतूक परवाना घेणे बंधनकारक आहे. परवानगीशिवाय लाकूड वाहतूक करणे हा भारतीय वन अधिनियम १९२७ अंतर्गत गुन्हा असून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. उपवनसंरक्षक प्रशांत खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक वनसंरक्षक अमृत शिंदे, वनपरिक्षेत्र अधिकारी यादव जाधव, संतोष बिरादार, सागर तांबे आणि वनविभागाच्या पथकाने ही कारवाई केली. प्रकरणाचा पुढील तपास वनपरिक्षेत्र अधिकारी यादव जाधव करीत आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे



### आगामी जि.प. व पं.स. ताब्यात घेण्यासाठी कामाला लागावे - अशोक बुटले

अर्धापूर (स. गांवकरी) : येणाऱ्या का येणाऱ्या काळात जि प व पंचायत समिती निवडणुका लवकरच जाहीर होणार असून काँग्रेस कार्यकर्त्यांनी एक दिलाने काम करून जि प व प.स.वर काँग्रेसचा झेंडा फडकवण्यासाठी जोमाने कामाला लागावे असे आवाहन काँग्रेसचे अशोक बुटले यांनी उपस्थितांना केले आहे. भाजपाचे लोणी येथील माजी सरपंच अशोक बुटले यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खासदार रवींद्र चव्हाण काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, युवा नेते पप्पू पाटील कोंढेकर यांच्या उपस्थितीत काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यामुळे अर्धापूर तालुका काँग्रेसच्या वतीने अशोक उठले यांचे आगमन होताच फटाक्याची आतिषबाजी करून ढोल ताशाच्या गजरात सत्कार करण्यात आला यावेळी तालुकाध्यक्ष सुनील वानखेडे,तालुका प्रभारी डॉ. उत्तमराव इंगळे, माजी सभापती मिर्जा अखतरउल्ला बेग,प्रल्हाद सोळंके,प्रवक्ते सुभाष लोणे,बळीराम पाटील हट्टेकर, युवा नेते अरविंद पाटील क्षीरसागर, शेख मकसूद, बालाजी जंगीलवाड, रवींद्र डाढाळे, दिगंबर पाटील,पुर्थ्वीराज लोणे, रमेश भुसे, मोहम्मद इब्राहिम, अँड गौरव सरोदे, अँड नितेश लोणे, मोहम्मद गौस खुरेशी, फेरोज पठाण, कु.शबाना बेगम,शेख शकील. यावेळी अनेक पदाधिकाऱ्यांनी काँग्रेस पक्ष वाढविण्यासाठी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

### ओतूर पोलीस ठाण्याच्या वतीने अपघात रोखण्यासाठी उपाययोजना

ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील ओतुर पोलीस स्टेशन हद्दीत अपघाताचे प्रमाण रोखण्याचे दृष्टीने वेगवेगळ्या उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी दिली. यावेळी ब्लॅक स्पॉट शोधुन सदर ठिकाणी रम्बलर बसविणे, साईन बोर्ड, बिल्नकर्स, कलर पट्ट्या मारणे तसेच नागरिकांमध्ये जन जागृती करून सुचनांचे बॅनर लावण्यात आले. सर्व प्रकारचे अपघात कमी करणे हेच एक ध्येय असून जे वाहनचालक नियम मोडतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. सर्व दुचाकी, चारचाकी नियमात व कमी वेगात वाहने चालवावीत वाहतुकीचे नियम पाळून सहकार्य करण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले.

### बादशाह तलाव परिसरात कत्तलीसाठी घेऊन जात असलेले गोवंश ताब्यात

शिवनेरी (स. गांवकरी) : बादशाह तलाव वीट भट्टी जवळ साहिल जाकीर पठाण वय २४ वर्ष त्याच्या ताब्यातील टाटा कंपनीचे मिनी पिकअप गाडी क्रमांक एम.एच ०४ ए.बी ६८ ०१ मध्ये तीन गोवंश जातीचे जनावरे आढळली आहे. जनावरे दाटीवाटीने कोंबून चारापाण्याची आगर औषधाची सोय न करता कत्तली करिता जुन्नर बाजूकडून नारायणगाव बाजूकडे जात असताना ताब्यात घेण्यात आले. साहिल जाकीर पठाण याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यास सदर गुन्ह्यात अटक करण्यात आलेले आहे. मुक्त करण्यात आलेले गोवंश संगमनेर येथे गोशाळेत जमा करण्यात आले. सदर अटक आरोपी हा अभिलेखा वरील गुन्हेगार असून अटक आरोपीवर यापूर्वी सुद्धा अशाच प्रकारे २ गुन्ह्यांची नोंद आहे. गोवंश बाबत गुन्हे करणाऱ्यावर अधिक कठोर कारवाई पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांचे आदेश आहेत. सदरची कारवाई डॉ. शुभम कुमार,अपर पोलीस अधीक्षक, धनंजय पाटील,उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड, स पो नी मोरे, पोसई टिटमे,पो. ह.महेश लांडगे,पो. शि. कैलास केंद्रे, दीपक वनवे, विशाल चौधरी, श्रीराम शिंदे, अमोल सातपुते, दादाभाऊ पावडे, विनोद पवार, गणेश शिंदे,विजय जंगम यांचे पथकाने केलेली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संकेत चौधरी करत आहेत.

### वाहतूक नियम साक्षरता अभियानांतर्गत विद्यार्थ्यांचे प्रबोधन!



नवी मुंबई (स. गांवकरी) : नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्रमांक १२३, अडवली-भुतवली येथे वाहतूक नियम साक्षरता अभियानांतर्गत विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात महापे वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नरेंद्रसिंग गिरासे व त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांची सविस्तर माहिती देत सुरक्षित वाहतुकीचे महत्त्व पटवून दिले. मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई तसेच मा. पोलीस उपआयुक्त (वाहतूक), नवी मुंबई यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या "वाहतूक नियम साक्षरता अभियान" अंतर्गत हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. मा. पोलीस निरीक्षक कदम यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षा, वाहतूक चिन्हे, हेल्मेट व सीटबेल्ट वापरण्याचे महत्त्व तसेच वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनीही वाहतूक नियमांबाबत विविध प्रश्न विचारून शंका निरसन करून घेतले. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागरूकता निर्माण झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल मनपा शाळेतील शिक्षकांनी महापे वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार मानत त्यांच्या जनजागृतीपर कार्याचे कौतुक केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये रस्ते सुरक्षेबाबत सकारात्मक संदेश पोहोचल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### १७ जिल्ह्यांना हाय अलर्ट, पंजाबराव डख यांचा मोठा इशारा



अहिल्यानगर (स. गांवकरी) : जूननंतर राज्यात मान्सून पुन्हा एकदा सक्रिय होईल आणि जोरदार पाऊस पडेल असा अंदाज भारतीय हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला होता. त्यानुसार आता मंगळवारपासून राज्यात पावसाला सुरुवात झाली आहे. येत्या ३० जूनपर्यंत मान्सूनची हीच स्थिती कायम असेल असा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. दरम्यान त्यानंतर आता हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी देखील मान्सूनबाबत आपला नवा अंदाज व्यक्त केला आहे. येत्या १० जुलैपर्यंत राज्यात जोरदार पाऊस होईल असा अंदाज त्यांनी व्यक्त केला आहे. महाराष्ट्रात पावसाचा जोर आणखी वाढत जाणार आहे, पुढील काही तासांमध्ये जळगाव जिल्हा, धुळे जिल्हा, नंदुरबार जिल्हा, नाशिक जिल्हा, अहिल्यानगर जिल्हा, बीड जिल्हा, परभणी जिल्हा, जालना जिल्हा, बुलाढाणा जिल्हा, अकोला जिल्हा, अमरावती जिल्हा, भंडारा, वर्धा, नागपूर जिल्हा, यवतमाळ जिल्हा असा सर्वत्र जोरदार पाऊस होणार आहे. २४ जून, २५ जून, २६ जून हे चार दिवस राज्यात पावसाचा जोर अधिक राहणार आहे, असा अंदाज पंजाबराव डख यांनी वर्तवला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### राहुरीतील स्टेट बँकेच्या रक्तदान शिबिराला चांगला प्रतिसाद

राहुरी (स. गांवकरी) : स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वर्धापन दिनानिमित्त बँकेच्या राहुरी येथील शाखेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. 1 जुलै रोजी स्टेट बँकेचा वर्धापन दिन असून या निमित्ताने दि . 25 जून रोजी रक्तदान शिबिर आयोजित केले. स्टेट बँकेच्या राहुरी शाखेत संपन्न झालेल्या रक्तदान शिबिरात अनेक ठेवीदार, खातेदारांनी बँकेच्या या उपक्रमाचे स्वागत केले. संगमनेर येथील अर्पण रक्त संकलन केंद्रच्या सुजाता वाघचौरे, लक्ष्मी माळी, साक्षी जागनर, रसिका रोहंगले यांनी रक्तदान प्रक्रियेत सहभाग घेतला व जनजागृतीही केली . स्टेट बँकेच्या राहुरी शाखेचे शाखाधिकारी सुनील पवार यांच्यासह बँकेचे वीरेंदर पांडेय, अंजुम पठाण, अतुल बंगाळ, वंदना वाघ, स्नेहा महाकुलकर, अमृता गायकवाड, मयुरी बेल्हेकर, कोमल गोपाळे, विद्या घेंबड, रवींद्र जगताप, राहुल गावडे, सिद्धार्थ जगताप, प्रसाद मैड, राजेंद्र परदेशी, शिवम मैड, किरण उदावंत, आदी उपस्थित होते.

### प्रशासकविना तामसा ग्रामपंचायतीचा कारभार




तामसा (स. गांवकरी) : मागील पाच महिन्यापासून प्रशासक नसतांना तामसा ग्रामपंचायतीचा कारभार कोणाच्या भरवशावर सुरू आहे, हा यक्ष प्रश्न गावकऱ्यांना पडला आहे. प्रशासक नसताना प्रशासनाची जबाबदारी नेमकी कोण पार पाडत आहे, याबाबत संभ्रमाचे वातावरण असून गावातील भीषण पाणीटंचाईसह अनेक गंभीर प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांचे मोठे हाल होत आहे. ग्रामपंचायत ही गावाच्या विकासाची प्रमुख यंत्रणा मानली जाते. मात्र तामसा येथे प्रशासकीय नेतृत्वाचा अभाव असल्याने अनेक विकासकामे रखडली आहेत. स्वच्छता, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था, गटारींची साफसफाई, सार्वजनिक आरोग्याशी संबंधित समस्या, शिक्षणाची वाताहत, आठवडी बाजाराची दुरवस्था, घाणीचे साम्राज्य, अनधिकृत बांधकामे, अनधिकृत प्लॉटिंगला परवाने आणि विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. अनेक वेळा तक्रारी करूनही त्याची कोणी दखल घेत नाही. विचारणा केलीच तर स्पष्ट उत्तर मिळत नाही. योग्य निर्णय घेणारा जबाबदार अधिकारी किंवा प्रशासक नसल्याने कामे प्रलंबित राहतात आणि नागरिकांची ससेहोलपट होते. परिणामी सध्या तामसा ग्रामपंचायतीचा कारभार "ना धड प्रशासक, ना धड जबाबदार अधिकारी" अशीच झाल्याची गावभर चर्चा रंगत आहे. विशेष म्हणजे, गावातील विविध समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असताना संबंधित तालुका व जिल्हा प्रशासन मात्र मूग गिळून गप्प का? सहा महिन्यात ग्रामपंचायतचे दप्तर तपासणी नाही, गडबडलेल्या आर्थिक व्यवहाराची, जमाखर्चाची तपासणी नाही. जणू आंधळं दळतंय अन् कुत्रं पीठ खातंय अशीच परिस्थिती निर्माण झाल्याने "लहरी राजा, प्रजा आंधळी, अधांतरी दरबार... उद्धवा, अजब तुझे सरकार!" हे गाणं सध्या तामसा ग्रामपंचायतीच्या कारभाराला तंतोतंत लागू पडत असल्याच्या संतप्त प्रतिक्रिया नागरिकांतून येत आहेत. प्रशासनाची निष्क्रियता आणि जबाबदारीचा अभावामुळे गावाचा विकास अधांतरी राहिला असून सर्वसामान्य नागरिक मात्र कमालीचे त्रस्त आहेत. तामसा ग्रामपंचायतीत प्रशासकाची तातडीने नियुक्ती करून कारभाराला दिशा देणे आवश्यक असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तामसावासीयांचा वनवास दूर होईल अशी अपेक्षा आहे.

## एल निनो प्रभावामुळे अनियमित पावसाची शक्यता

### शेतकऱ्यांसाठी इगतपुरी कृषी विभागाचे आवाहन

इगतपुरी : (स. गांवकरी)

हवामान विभागाच्या अंदाजानुसार यावर्षी 'एल निनो' स्थिती सक्रिय असण्याची शक्यता असल्याने पावसाचे प्रमाण कमी किंवा खंडित राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी या परिस्थितीमध्ये आपल्या शेतीचे योग्य नियोजन करावे असे आवाहन नाशिक विभागाचे विभागीय कृषी सह संचालक श्री सुभाष काटकर यांनी इगतपुरी तालुक्याच्या दौऱ्यादरम्यान यांनी केले आहे. तालुक्यात खरीपाचे एकूण सरासरी क्षेत्र 30947.24 हे. असून यामध्ये मुख्यत्वे भात 26210.85 हे., वरई 1016.90 हे., नाचणी/ नागली 1514.80 हे., सोयाबीन 502.90 हे. या पिकांचा समावेश होतो. या हंमागामध्ये या पिकांची एल निनो पार्श्वभूमीवर काळजी घेणे आवश्यक आहे.

मागील वर्षी 21 जून 2025 अखेर 298.90 मि.मि. पाऊस झाला होता. एल निनो च्या पार्श्वभुमीवर यावर्षी आजपर्यंत फक्त 8.90 मि.मि. पाऊस झालेला आहे. यावर्षी भारतीय हवामान विभागानेही सरासरीच्या 90% +_5% इतक्या पावसाचा अंदाज व्यक्त केलेला आहे. त्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम राबवण्यात येत असून, शेतकऱ्यांनी खालील मुद्द्यांचा काटेकोर अवलंब करावा : घाईघाईने पेरणी टाळा(पावसाची खात्री करा )- अपुऱ्या पावसावर किंवा पहिल्याच



मोठ्या पावसावर घाईघाईने पेरणी करू नका. जोपर्यंत 75 ते 100 मिमी पाऊस पडत नाही व जमिनीमध्ये पेरणीयोग्य पुरेशी ओल निर्माण होत नाही आणि पावसाची खात्री पटत नाही, तोपर्यंत पेरणी करणे टाळावे.

संपूर्ण क्षेत्राची एकाच दिवशी पेरणी टाळा - जोखीम कमी करण्यासाठी आपल्या संपूर्ण शेती क्षेत्रावर एकाच दिवशी पेरणी न करता टप्प्याटप्प्याने पेरणीचे नियोजन करावे, जेणेकरून पावसाचा खंड पडल्यास संपूर्ण पीकाचे एकाच वेळी होणारे नुकसान टाळता येईल. राखीव बियाण्याचा साठा ठेवा - पावसाच्या लहरीपणामुळे जर पहिली पेरणी उलटली (दुबार पेरणीची वेळ आली), तर ऐनवेळी धावपळ होऊ नये म्हणून शेतकऱ्यांनी आपल्याकडे राखीव बियाण्याचा साठा करून ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. तालुक्यात भाताचे 26210 हे व सोयाबीनचे क्षेत्र 253 हेक्टर आहे, यासाठी मागील 3 वर्षात बाजारातून बियाणे घेतले असेल तर घरचेच बियाणे, बियाणे उगवण क्षमता तपासून राखीव ठेवणे व पेरणे योग्य राहील. कमी कालावधीच्या आणि दुष्काळसहिष्णू वाणांना प्राधान्य - दीर्घ मुदतीच्या पिकांऐवजी कमी कालावधीत तयार होणाऱ्या आणि पाण्याचा ताण सहन करू शकणाऱ्या (दुष्काळसहिष्णू) पिकांची व वाणांची निवड करावी. यामुळे कमी पावसातही हातात उत्पादन येण्याची शक्यता वाढते

धान्य व कडधान्य पिकांची निवड - तालुक्यात भाताच्या बांधावर तूर,मूग, उडीद यांसारख्या कमी पाण्यात येणाऱ्या पारंपरिक पिकांना प्राधान्य द्यावे. डोंगराळ भागासाठी नाचणी, वरई यासारख्या पिकांची लागवड उताराला आडवी करावी.

गादीवाफा (BBF - Broad Bed Furrow) पद्धती : सोयाबीन पेरणीसाठी गादीवाफा पद्धतीचा अवलंब करा. या पद्धतीमुळे कमी पाऊस झाल्यास पिकाच्या मुळांशी पाणी साठून राहते आणि जास्त पाऊस झाल्यास पाण्याचा निचरा व्यवस्थित होतो. जरी bbf मशीन उपलब्ध झाले नाही तरी पेरणी यंत्राने पेरणी करताना एका ओळींचा नळा बंद करावा व उगवणींनंतर 15 दिवसांनी मृत सरी काढावी. तसेच भात पिकाची DSR /SRT पद्धतीने गादी वाफ्यावर पेरणी करावी. संरक्षित सिंचन आणि शेततळे निर्मिती - पावसाचे पाणी साठवण्यासाठी शेतामध्ये शेततळे किंवा जलसाठे निर्माण करण्यावर भर द्यावा. यासाठी शेततळ्यासाठी अर्ज प्रक्रिया सुरू आहे उपलब्ध असलेल्या शेततळ्यामध्ये साठवलेले हे पाणी केवळ पिकाला पाण्याचा ताण पडेल अशा संवेदनशील अवस्थेत 'संरक्षित सिंचन' म्हणून वापरण्यासाठी राखून ठेवावे. सुक्ष्म सिंचनाचा (ठिबक व तुषार) काटेकोर वापर - उपलब्ध पाण्याचा थेंब अन् थेंब वाचवण्यासाठी मोकाट पद्धतीने पाणी न देता केवळ ठिबक (Drip) किंवा तुषार (Sprinkler) सिंचन पद्धतीचाच वापर करावा.

## पोलिओ अभियान यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे

किनवट : (स. गांवकरी)



डॉ. किरणकुमार नेम्मानिवार

केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय तसेच राज्य शासनाच्या आरोग्य विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत रविवारी (दि. २८) "दो बूंद जिंदगी के" हे विशेष अभियान आयोजित करण्यात आले आहे. या अभियानात शून्य ते पाच वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजून पोलिओमुक्त भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी नागरिकांनी सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन किनवट शहरातील नागरी दवाखान्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ. किरणकुमार नेम्मानिवार यांनी केले आहे. डॉ. नेम्मानिवार यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पोलिओ हा अतिशय संसर्गजन्य व कायमस्वरूपी अपंगत्व निर्माण करणारा आजार आहे. या आजारावर निश्चित उपचार उपलब्ध नसले तरी वेळेवर आणि नियमित लसीकरणाद्वारे त्याचा प्रभावी प्रतिबंध करता येतो. त्यामुळे जन्मापासून पाच वर्षांपर्यंतच्या सर्व बालकांना, यापूर्वी अनेक वेळा पोलिओचे डोस दिलेले असले तरी, या विशेष मोहिमेदरम्यान पुन्हा एकदा पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब देणे आवश्यक आहे. राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेच्या अनुषंगाने किनवट शहर व तालुक्यात विविध ठिकाणी विशेष पोलिओ लसीकरण बूथ उभारण्यात आले असून आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी, आशा सेविका, अंगणवाडी सेविका तसेच स्वयंसेवक यांच्या माध्यमातून व्यापक स्तरावर लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. बूथवर अनुपस्थित राहिलेल्या बालकांसाठी घरभेटीद्वारेही लसीकरणाची व्यवस्था करण्यात आली आहे. शून्य ते पाच वर्षे वयोगटातील एकही बालक पोलिओच्या डोसपासून वंचित राहू नये, यासाठी पालकांनी कोणत्याही अफवा किंवा गैरसमजांना बळी न पडता आपल्या पाल्यांना जवळच्या पोलिओ केंद्रावर घेऊन जावे आणि आरोग्य विभागाच्या या महत्त्वपूर्ण उपक्रमास सहकार्य करावे, असे आवाहन डॉ. किरणकुमार नेम्मानिवार यांनी केले आहे. "प्रत्येक बालक निरोगी आणि पोलिओ मुक्त राहावे, यासाठी 'दो बूंद जिंदगी के' या राष्ट्रीय अभियानात सर्वांनी सहभागी होऊन ते यशस्वी करावे," असेही त्यांनी नमूद केले.

## पत्रकार लक्ष्मण सोनवणे यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

इगतपुरी : (स. गांवकरी)



शेती आणि ग्रामीण जीवनाचा अत्यंत जवळून अभ्यास करणारे आणि आपल्या लेखणीतून शेतकरी प्रश्नांना वाचा फोडणारे पत्रकार लक्ष्मण बबन सोनवणे यांना महाराष्ट्र शासनाचा प्रतिष्ठित 'वसंतराव नाईक शेती मित्र' पुरस्कार २०२४ जाहीर झाला आहे. कृषी क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यासाठी हा पुरस्कार दिला जातो. लक्ष्मण सोनवणे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून कृषी पत्रकारितेच्या माध्यमातून शेतीतील नवनवीन तंत्रज्ञान, यशस्वी प्रयोग आणि शेतकऱ्यांच्या समस्या शासन दरबारी मांडण्याचे काम केले आहे. त्यांच्या या निष्काम आणि सामाजिक बांधिलकीच्या कार्याची दखल घेत शासनाने त्यांना या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवडले आहे. श्री. सोनवणे यांना हा मानाचा पुरस्कार जाहीर होताच पत्रकारिता आणि कृषी क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पुरस्काराबद्दल प्रतिक्रिया देताना लक्ष्मण सोनवणे यांनी सांगितले की, "शेतकऱ्यांचे प्रश्न मांडणे हे मी माझे कर्तव्य समजतो. या पुरस्कारामुळे जबाबदारी अधिक वाढली असून, आगामी काळातही शेतकऱ्यांच्या हितासाठी माझे कार्य सुरूच राहील." त्यांच्या यशाबद्दल आदींनी अभिनंदन केले आहे.

## राष्ट्रीय खो-खो पंच परीक्षेत अकोलेच्या तिघांची दमदार कामगिरी!

### सदानंद चव्हाण, प्रतिक नेटके आणि संतोष फोडसे विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण; क्रीडा क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव!

अकोले : (स. गांवकरी)



अकोले तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरावी अशी उल्लेखनीय कामगिरी राष्ट्रीय स्तरावर नोंदविण्यात आली आहे. सोलापूर येथे मे महिन्यात आयोजित करण्यात आलेल्या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय खो-खो पंच परीक्षा (National Kho-Kho Referee Exam) चा नुकताच निकाल जाहीर झाला असून, अकोले तालुक्यातील सदानंद चव्हाण, प्रतिक नेटके आणि संतोष फोडसे यांनी विशेष प्राविण्यासह (डिस्टिंक्शन) यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळे तालुक्याच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक होत आहे. राष्ट्रीय खो-खो पंच परीक्षा ही देशातील सर्वात कठीण आणि दर्जेदार परीक्षांपैकी एक मानली जाते. या परीक्षेमध्ये खेळाचे अद्ययावत नियम, पंच म्हणून आवश्यक असलेली तांत्रिक समज, शारीरिक क्षमता चाचणी (फिटनेस टेस्ट) तसेच मैदानावरील अचूक आणि जलद निर्णयक्षमता यांची कसून परीक्षा घेतली जाते. या सर्व टप्प्यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत अकोलेच्या या तिघांनी यशाचा मानाचा तुरा रोवला आहे. या यशामुळे सदानंद चव्हाण, प्रतिक नेटके आणि संतोष फोडसे यांना आता राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये पंच म्हणून काम करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्यांच्या या यशामुळे अकोले तालुक्याचे नाव राष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात अधिक उंचावले गेले आहे. या परीक्षेसाठी त्यांना राष्ट्रीय पंच विकास साबळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या मेहनतीचे फलित म्हणून हे यश मिळाल्याची भावना यशस्वी उमेदवारांनी व्यक्त केली. क्रीडाप्रेमी, खेळाडू, प्रशिक्षक, विविध क्रीडा संघटनांचे पदाधिकारी तसेच हितचिंतकांकडून तिन्ही यशस्वी पंचांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्या यशाचे कौतुक करताना हे यश केवळ वैयक्तिक नसून संपूर्ण अकोले तालुक्यासाठी अभिमानाची बाब असल्याचे सांगितले. या तिघांच्या यशामुळे खो-खो खेळात करिअर घडवू इच्छिणाऱ्या युवकांना तसेच पंच म्हणून पुढे येऊ इच्छिणाऱ्या नवोदितांना निश्चितच प्रेरणा मिळणार असून, तालुक्यातील क्रीडा चळवळीला नवसंजीवनी मिळेल, असा विश्वास क्रीडा क्षेत्रातून व्यक्त केला जात आहे.

## विद्यार्थी आरोग्य जागृती अभियानांतर्गत मार्गदर्शन व्याख्यानांचे आयोजन!

ब्राम्हणवाडा : (स. गांवकरी)

आदिम आदिवासी आरोग्यवर्धिनी फाऊंडेशन संचालित श्री सुखप्रदा हॉस्पिटल, सह्याद्री विद्यालय ब्राम्हणवाडा आणि अकोले तालुका मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी विशेष आरोग्य जनजागृती व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. दि. २४ जून रोजी सह्याद्री विद्यालयात झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले.



विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय सहमंत्री तथा प्रवक्ते शंकरजी गायकर यांच्या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमात पौगंडावस्थेतील मुलींमध्ये होणारे शारीरिक व मानसिक बदल, मासिक पाळीदरम्यान घ्यावयाची काळजी, संतुलित आहाराचे महत्त्व तसेच महिलांच्या आरोग्याशी संबंधित विविध बाबींवर स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. रश्मी घोलप यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींच्या शंकांचे समाधानकारक निरसनही त्यांनी केले.

त्यानंतर दंतविकारतज्ज्ञ डॉ. प्रतीक घोडके यांनी मुखदंत आरोग्य व व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम या विषयावर मार्गदर्शन केले. दातांची योग्य निगा, दात घासण्याची योग्य पद्धत, टूथब्रश व टूथपेस्टची निवड याविषयी प्रात्यक्षिकासह माहिती देत तंबाखू, गुटखा, सिगारेट यांसारख्या व्यसनांमुळे होणाऱ्या गंभीर आजारांबाबत विद्यार्थ्यांना जागरूक करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रदीप भाटे यांनी केले. त्यांनी आदिम आदिवासी आरोग्यवर्धिनी फाऊंडेशनच्या विविध सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रमांची माहिती देताना आगामी प्रकल्पांचाही आढावा मांडला. यावेळी श्री वरदविनायक देवस्थान, कोतुळ यांच्या सहकार्याने सुरू होणाऱ्या "रुग्णोपयोगी साहित्य बँक" या उपक्रमाची माहिती देण्यात आली. या माध्यमातून अपघातग्रस्त, ब्रेन स्ट्रोकग्रस्त व अंथरुणाला खिळलेल्या रुग्णांसाठी विविध वैद्यकीय साहित्य नाममात्र दरात उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

कार्यक्रमास प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. विवेक घायाळ, विद्यालयाच्या प्राचार्या सुनीता शेलार, पर्यवेक्षक दारोळे सर, प्रा. जनार्धन हासे, शांताराम साबळे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. सतीश वाळुंज, उपसरपंच सुभाष गायकर, सदस्य शिवाजी आरोटे, रवी हांडे, योगेश आरोटे, भारत आरोटे, धोंडीभाऊ चव्हाण, गोकुळ आरोटे यांच्यासह अनेक मान्यवरांनी कार्यक्रमास उपस्थिती लावली.

अकोले तालुका मेडिकल असोसिएशन, प्राथमिक आरोग्य केंद्र ब्राम्हणवाडा, ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा आणि श्री कृष्ण दूध उत्पादक सहकारी संस्था यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी हा कार्यक्रम उपयुक्त ठरला.

## रस्त्यावरील कथित अतिक्रमण प्रकरण पुन्हा चर्चेत

तामसा : (स. गांवकरी)

तामसा येथील नांदेड रोडलगत असलेल्या मुख्य रस्त्यावर उभारण्यात आलेल्या कथित अतिक्रमणाच्या प्रकरणाने पुन्हा एकदा जोर धरला आहे. यासंदर्भात नागरिकांनी केलेल्या तक्रारीनंतर ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद नांदेड यांनी पंचायत समिती हदगावच्या गटविकास अधिकाऱ्यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. प्राप्त माहितीनुसार, तामसा शहरातील मुख्य रस्त्यालगत एका खासगी मालमत्तेच्या बांधकामाबाबत नागरिकांनी सार्वजनिक रस्त्यावर अतिक्रमण झाल्याची तक्रार केली होती. याबाबत यापूर्वी स्थानिक वृत्तपत्रातही "रस्त्यावरच उभारले बांधकाम; नागरिकांचा संताप, कारवाईची मागणी" या मथळ्याखाली बातमी प्रसिद्ध झाली होती. या बातमीनंतर आणि नागरिकांच्या निवेदनानंतर संबंधित प्रकरणाची दखल प्रशासनाने घेतल्याचे दिसून येत आहे. जिल्हा परिषद नांदेड येथील उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी 28 एप्रिल 2026 रोजी जारी केलेल्या पत्रानुसार, संबंधित तक्रारीची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून वस्तुस्थिती तपासावी, अतिक्रमण असल्यास नियमांनुसार कार्यवाही करावी आणि सविस्तर अहवाल सादर करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत.

नागरिकांचे म्हणणे आहे की, मुख्य रस्त्याच्या हद्दीत येणारे कोणतेही बांधकाम किंवा अतिक्रमण सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे ठरू शकते. त्यामुळे निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळल्यास कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

## चुकीचे निदान की हलगर्जीपणा?

तामसा : (स. गांवकरी)

तामसा येथे डॉक्टरच्या चुकीच्या उपचारामुळे एका ४० वर्षीय महिलेचा चार दिवसांपूर्वी मृत्यू झाल्याच्या खळबळजनक घटनेची जोरदार चर्चा आहे. उपचारादरम्यान प्रकृती बिघडल्यामुळे महिलेला विष्णुपुरीच्या शासकीय रुग्णालयात हलविले, मात्र महिला मरण पावल्याने चांगलीच खळबळ उडाली. आर्थिक तडजोड होऊन प्रकरण दडपण्याचा प्रयत्न तर होत नाही ना, असा सवाल उपस्थित होत असून तो डॉक्टर कोण? याचा शोध घेऊन कारवाई होणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. किरकोळ आजारावर उपचार घेण्यासाठी एक महिला तामसा येथील एका खाजगी दवाखान्यात दाखल झाली होती. आजाराचे योग्य निदान न करता महिलेवर उपचार करण्यात आले.

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर–आंबेगाव यांचे कोर्टात...**

क्र. फौज जन्म–मृत्यू/एसआ/ ६९५/२६ दिनांक: १६.६.२०२६

**श्रीम. सखुबाई पांडुरंग साबळे**, रा.निमगिरी, ता जुन्नर जि पुणे **...अपिलार्थी**

**विरुद्ध......... निबंधक**, जन्म – मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/ मुख्याधिकारी **.....प्रतिवादी**
**ग्रामपंचायत निमगिरी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार **श्रीम. सखुबाई पांडुरंग साबळे** रा निमगिरी ता जुन्नर जि पुणे यांचा/ यांची स्वतः नामे **सखुबाई पांडुरंग शेळके** यांचा / हिचा **जन्म** दिनांक **१/१/१९५२ रोजी मौजे निमगिरी**, ता. जुन्नर जि.पुणे येथे झालेले आहे. यांचा **जन्म** नोंदीचा हुकूम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ ६९५/२६ दिनांक ५.१२.२०२५ रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. १६/६/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनिशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**(अर्चना तांबे)**
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर – आंबेगाव उपविभागीय मंचर (पुणे)**

### Agasti Sahakari Sakhar Karkhana Ltd, Agastinagar

Tal-Akole Dist-Ahilyanagar
ph (02424) 222775/297126 Email -agastisakhar@rediffmail.com

**TENDER NOTICE FOR SALE OF C-Heavy Molasses**

We are in Market to sale Following C-Heavy 'A' grade Molasses immediately as

| Sr. No. | Kind of Molasses | Quantity (MT) |
|---|---|---|
| 1 | C-Heavy Molasses ('A' grade ) of Season 2025-26 | 3.50 Lakh Ltrs. |

The purchasers are requested to send your highest quote rate by mail on or before dt 29/06/2026 at karkhana site karkhana reserves right to accept / cancelled / reject any or all tenders without assigning any reason

(Sudhir Kapdnis) Managing Director
(Smt. Sunitatai Bhangare) Vice Chairman
(Sitaram Patil Gaikar) Chairman

### TENDER NOTICE

Founder : Karmaveer Bhaurao Patil

Principal, Rayat Shikshan sanstha's Saraswati Vidyalayay
at- Visapur, Tal-Shrigonda , Dist- Ahilyanagar.
Invite E–tender for
job through the website of MKCL, https://www.edumart.sets.co.in

| Name of the work | Estimated cost in (Rs.) (Excluding GST) | Start Date | Last Date |
|---|---|---|---|
| Proposed School Building for Saraswati Vidyalayay at- Visapur, Tal-Shrigonda Dist- Ahilyanagar.(G.F. +F.F) | 1,81,82,976 /- | 23/06/2026 | 09/07/2026 |

Principal
Saraswati Vidyalayay at- Visapur,
Tal- Shrigonda Dist- Ahilyanagar.
Contact no. :- 9421165146

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी



# रोबोटिक तंत्रज्ञानामुळे शस्त्रक्रिया अचूक सुरक्षित व परिणामकारक

शिवनेरी : (स. गांवकरी)

रोबोटिका तंत्रज्ञानामुळे शस्त्रक्रिया अचूक सुरक्षित व परिणामकारक होतात. गुड्याची शस्त्रक्रिया रोबोटिका माध्यमातून अचूकता साध्य होत आहे. यामुळे रुग्णांना कमी वेदना व कमी रक्तस्राव होतो. असे रोबोटिक तंत्रज्ञान शल्य चिकित्सक भव्य उद्घाटन प्रसंगी डॉ. प्रदीप जोशी चेअरपर्सन मेडिकल प्रोक्टिशनर असोसिएशन यांनी या कार्यक्रमाप्रसंगी सांगितले. डॉ. शिवाजी सोनवणे यांची जिद्द १७ ते १८ तासवैद्यकीय क्षेत्रासाठी सेवा करण्याची तयारी आहे. असे डॉ. जोशी यांनी सांगितले. उत्तर पुणे जिल्हा व बारा तालुक्यांमध्ये



सर्वप्रथमच सांधे प्रत्यारोपण करणारा रोबोट जुन्नर तालुक्यात आणला आहे यामुळे रुग्णांना सोय उपलब्ध झाली असे गौरव उद्गार चेअरमन डॉ. मंगेश आमले यांनी काढले. शिवसेना मदत कक्ष सहाय्यता निधी मंगेश दिवटे, पं. स. सदस्य जयसिंग पोटे, माजी पं. स. सदस्य जीवन शिंदे, माजी अप्पर आयुक्त के बी वाघमारे, जि. प. सदस्य मंगेश काकडे, डॉ. प्रशांत काचळे आदी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. वैभव मुरादे, सोपान पवार, भरत कोल्हार, रमेश टाव्हरे, लक्ष्मण शेळके, सुलोचना वाघमारे, तुकाराम दाभाडे, हौसा काळे, दादा चिकणे व इतर सर्व आधुनिक शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांच्या सत्कार याप्रसंगी करण्यात आला. सचिन भोजने, डॉ. मिलिंद कसबे, दिपक काशीद, ज्योती शेलार, मेजर रमेश खरमाळे या मान्यवरांनी पशुपक्षी, बेघर भटकंती मानव, समाजातील नैसर्गिक परिस्थितीमध्ये संकट आल्यानंतर समाज हितासाठी सदैव तत्पर असणारे सचिन भोजने, डॉ. मिलिंद कसबे, दिपक काशीद, ज्योती शेलार, मेजर रमेश खरमाळे समाजसेवकांचा समाजभूषण पुरस्कार देऊन प्रमाणपत्र, ट्रॉफी, शाल, श्रीफळ देऊन मान्यवरांच्या हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला. आजचा दिवस अत्याधुनिक यंत्राचा उद्घाटन नाही एक स्वप्नाचा व जिद्दीचा उत्साह आहे. गुड्या व सांधेसाठी प्रथम रोबोटिका कार्यान्वित होत आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय दर्जाची रुग्ण सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे असे प्रस्ताविकामध्ये डॉ. शिवाजी रोहिदास सोनवणे यांनी सांगितले. डॉ. प्रदीप शिंगोटे, डॉ. संदीप काकडे, रोहिदास सोनवणे, समाजसेवक संभाजी साळवे, डॉ. प्रशांत काचळे, डॉ. मनोज काकडे, जनाबाई सोनवणे आदी पदाधिकारी व मान्यवर बहुसंख्य उपस्थित होते. सूत्रसंचालन पत्रकार विलास कडलक व आभार डॉ. स्मिता सोनवणे यांनी मांडले.

## वैभवराव पिचड यांच्या प्रकृतीची विचारपूस; डॉ. विश्वासराव आरोटे यांनी घेतली भेट!





राजूर (प्रतिनिधी) : अकोले विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार तथा अमृतसागर दूध संघाचे विद्यमान अध्यक्ष वैभवराव पिचड यांच्यावर मुंबई येथे यशस्वी शस्त्रक्रिया झाल्यानंतर ते नुकतेच मतदारसंघात परतले. यानिमित्त महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी राजूर येथील त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेत प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी ज्येष्ठ पत्रकार प्रकाश महाले व विलास तुपे उपस्थित होते. भेटीदरम्यान वैभवराव पिचड यांच्या प्रकृतीविषयी चर्चा झाली तसेच त्यांनी लवकर बरे होऊन पुन्हा जोमाने जनसेवेत सक्रिय व्हावे, अशा शुभेच्छा देण्यात आल्या. डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सांगितले की, मैत्री, सामाजिक संबंध आणि परस्पर स्नेह यांना विशेष महत्त्व असते. कोरोना काळात वैभवराव पिचड यांनी दिलेल्या सहकार्याची आठवणही त्यांनी यावेळी सांगितली. यशस्वी शस्त्रक्रियेनंतरही वैभवराव पिचड यांच्या मनातील जनसेवेची जिद्द आणि मतदारसंघासाठी काम करण्याची तळमळ कायम असल्याचे या भेटीत जाणवले. यावेळी डॉ. आरोटे यांच्या हस्ते वैभवराव पिचड यांचा शाल, पुष्पगुच्छ व टोपी देऊन सत्कार करण्यात आला.

## थोडक्यात बातम्या...



### पद्मश्री पुरस्कार मिळल्याबद्दल रघुवीर खेडकर यांचा घोडेगाव येथे गौरव

नेवासा (स. गांवकरी) : कला,संस्कृती आणि महाराष्ट्राच्या लोकपरंपरेचा अभिमान असलेले सुप्रसिद्ध तमाशा कलावंत रघुवीर खेडकर यांना केंद्र सरकारने पद्मश्री पुरस्कार बहाल केल्यानंतर त्यांनी नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथे सदिच्छा भेट दिली.त्यांच्या या भेटीचा क्षण घोडेगावकरांसाठी आनंद आणि अभिमानाचा ठरला. घोडेगाव येथील दीपक हिंदू खाणावळ या फर्मच्या जाधव परिवाराशी त्यांचे अनेक वर्षांपासून घनिष्ठ संबंध असल्याने त्यांनी पुरस्कार मिळाल्यानंतर घोडेगावला भेट दिली यावेळी माजी पंचायत समितीचे सदस्य अरुणकाका जाधव व दीपकभाऊ जाधव या परिवाराच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या कलासाधनेचा, संघर्षाचा आणि महाराष्ट्राच्या लोककलेला दिलेल्या योगदानाबद्दल गौरव करण्यात आला "महाराष्ट्राच्या लोककलेचा वारसा जपणाऱ्या अशा कलाकाराचा सन्मान करणे ही घोडेगावकरांसाठी अभिमानाची बाब असल्याची भावना यावेळी उपस्थित मान्यवरांनी बोलतांना व्यक्त केली.पद्मश्री रघुवीर खेडकर यांच्या सदिच्छा भेटीने घोडेगावच्या वातावरणात आनंद, प्रेरणा आणि अभिमानाची भावना निर्माण झाली. यावेळी दिपकभाऊ जाधव,अरुणकाका जाधव यांच्या समवेत दादा पाटील दरंदले, विष्णू चौधरी,अमोल जाधव, अशोक सातपुते,शफी शेख,गणेश महाडिक आरुष जाधव दादा जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. पद्मश्री रघुवीर खेडकर यांच्या उपस्थितीने घोडेगावच्या वातावरणात आनंद, प्रेरणा आणि अभिमानाची भावना निर्माण झाली.

### डिलिव्हरी लॉजिस्टिक कंपनीनची फँचाईजीचे अमीष दाखवत फसवणूक

अहिल्यानगर (स. गांवकरी) : डिलिव्हरी लॉजिस्टिक कंपनीची फ्रँचायजी मिळवून देण्याचे आमिष दाखवत संगमनेर येथील एका मेडिकल व्यावसायिकाची ५ लाख ५० हजार रूपयांची ऑनलाइन फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी येथील सायबर पोलीस ठाण्यात मंगळवारी (२३ जून) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पावबाकी रोड, संगमनेर परिसरात राहणाऱ्या ४६ वर्षीय व्यक्तीने यासंदर्भात फिर्याद दिली आहे. ते मेडिकल व्यवसाय करतात. त्यांना एका नामांकित डिलिव्हरी लॉजिस्टिक कंपनीची संगमनेर येथे फ्रँचायजी घ्यायची होती. यासाठी त्यांनी इन्स्टाग्रामवर दिसलेल्या एका जाहिरातीतील फॉर्म भरून माहिती दिली होती. त्यानंतर मयांक गुप्ता नावाचा व्यक्ती (पूर्ण नाव माहिती नाही) तसेच परमार नावाचा व्यक्ती आणि प्रियंका नावाच्या महिलेने फिर्यादीशी मोबाईलव्दारे संपर्क साधला. त्यांनी स्वतःला संबंधित कंपनीचे प्रतिनिधी असल्याचे भासवून विविध शुल्क, नोंदणी प्रक्रिया आणि फ्रँचायजी मंजुरीच्या नावाखाली वेळोवेळी पैसे भरण्यास सांगितले. आरोपींनी फिर्यादीचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून एकूण ५ लाख ५० हजार रूपये उकळल्याचा आरोप आहे. पैसे भरल्यानंतरही फ्रँचायजी मिळाली नाही. तसेच संबंधित व्यक्तींशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद मिळेनासा झाल्याने आपली फसवणूक झाल्याचे फिर्यादीच्या लक्षात आले. या प्रकरणात आरोपींनी विविध मोबाईल क्रमांक तसेच ई-मेल आयडींचा वापर केल्याचे समोर आले आहे. सदरचा प्रकार २० मार्च २०२६ ते ६ एप्रिल २०२६ दरम्यान घडला असून फिर्यादीने २३ जून रोजी सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलीस निरीक्षक सागर ढिकले करीत आहेत. सोशल मीडिया, इन्स्टाग्राम, फेसबुक किंवा इतर ऑनलाइन माध्यमांवर दिसणाऱ्या फ्रँचायजी, नोकरी, गुंतवणूक अथवा व्यवसायाच्या आकर्षक ऑफरवर विश्वास ठेवण्यापूर्वी संबंधित कंपनीची अधिकृत वेबसाइट, कार्यालय व संपर्क तपशीलांची खातरजमा करावी. कोणत्याही प्रकारचे शुल्क भरताना सावधगिरी बाळगावी, असे आवाहन सायबर पोलिसांनी केले आहे.

### प्रणिता सोमन आणि मनाली रत्नोजी यांचा भारतीय संघात कामगिरी




अहिल्यानगर (स. गांवकरी) : उझबेकिस्तान येथे २० ते २८ जून २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या "एशियन माउंटन बाईक सायकलिंग चॅम्पियनशिप" मध्ये भारतीय संघाने उल्लेखनीय कामगिरी करत पहिल्याच दिवशी क्रॉस कंट्री मिक्स्ड रिले या प्रकारात कांस्यपदक पटकावले. या ऐतिहासिक यशामुळे भारतीय माउंटन बायकिंग क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.या पदक विजेत्या भारतीय संघामध्ये महाराष्ट्रातील दोन महिला सायकलपटूंची निवड झाली होती.त्यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्याची प्रणिता सोमन आणि पुण्याची मनाली रत्नोजी यांचा समावेश होता. त्यांच्यासह आशिष शेरपा, के. हर्षिनी, संतोष प्राणेश आणि नोरबू यांनी संघाचे प्रतिनिधित्व केले. दिग्गज आणि बलाढ्य आशियाई प्रतिस्पर्ध्यांच्या उपस्थितीत भारतीय संघाने अत्यंत संयमी, तांत्रिक आणि दमदार कामगिरी करत कांस्यपदकावर आपले नाव कोरले.

# माहिती अधिकार कायद्यातील दुरुस्त्यांविरोधात अण्णा हजारे आक्रमक

## ५ जुलैपर्यंत मागण्या मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशारा

पारनेर : (स. गांवकरी)

केंद्र सरकारने माहिती अधिकार कायद्यात केलेल्या विवादास्पद दुरुस्त्या आणि त्यामुळे कायद्याची होणारी घसरण याविरोधात ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी एल्गार पुकारला आहे. या विषयावर चर्चा करण्यासाठी राळेगणसिद्धी येथे आयोजित करण्यात आलेली तज्ज्ञांची बैठक निष्फळ ठरल्याने, अण्णा हजारे आता आंदोलनावर ठाम आहेत.



या अत्यंत महत्त्वाच्या बैठकीला राज्याचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांच्यासह माहिती अधिकार क्षेत्रातील अनेक तज्ज्ञ आणि अभ्यासक उपस्थित होते. बैठकीत कायद्यातील त्रुटी आणि सरकारची मनमानी धोरणे यावर सविस्तर मंथन झाले. मात्र, बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना अण्णा हजारे यांनी सरकारच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, "सरकारकडून आम्हाला कोणतेही समाधानकारक उत्तर मिळालेले नाही. माहिती अधिकार कायद्याचा आत्मा जिवंत ठेवायचा असेल, तर सरकारने तातडीने एक नवीन उच्चस्तरीय समिती नेमणे गरजेचे आहे. या समितीमध्ये कायद्याचा सखोल अभ्यास असलेले आणि लोकशाहीवादी विचारांचे अधिकारी असणे अनिवार्य आहे."

माहिती अधिकाराची गळचेपी कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाही, असा सज्जड इशारा अण्णांनी दिला आहे. आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी अण्णा हजारे यांनी सरकारला ५ जुलैपर्यंतची अंतिम मुदत दिली आहे. या कालावधीत सरकारने सकारात्मक निर्णय न घेतल्यास, देशव्यापी जनआंदोलन छेडण्याचा पवित्रा अण्णांनी घेतला आहे.

दरम्यान, मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांनी सांगितले की, या बैठकीत झालेल्या चर्चेची सविस्तर माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिली जाईल. त्यानंतर मुख्यमंत्री आणि अण्णा हजारे यांच्यात होणाऱ्या चर्चेतून पुढील दिशा ठरेल. एकीकडे सरकार या मुद्द्यावर काय भूमिका घेते आणि दुसरीकडे अण्णांचे आंदोलनाचे हत्यार पुन्हा एकदा उपसले जाते का, याकडे आता संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. माहिती अधिकार कायदा हा जनतेचा 'ब्रह्मास्त्र' मानला जातो आणि तो कमकुवत झाल्यास पारदर्शकतेवर गदा येईल, अशी भीती कार्यकर्त्यांकडून व्यक्त केली जात आहे. आता ५ जुलैपर्यंत सरकार आणि अण्णा हजारे यांच्यातील हा तिढा सुटतो की आंदोलनाची ठिणगी पडते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# आयुक्त मुंढेंच्या बदलीच्या चर्चांना पूर्णविराम

पारनेर : (स. गांवकरी)

■ आमदार दातेंच्या लक्षवेधीवर मंत्र्यांची स्पष्ट ग्वाही

राज्यभरात भेसळयुक्त अन्नपदार्थ, बनावट दुग्धजन्य पदार्थ, गुटखा, तंबाखू आणि निकृष्ट दर्जाच्या खाद्य वस्तूंविरोधात अन्न व औषध प्रशासन विभागाने सुरू केलेल्या धडक कारवाईच्या पार्श्वभूमीवर विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या संभाव्य बदलीबाबत विविध स्तरावर चर्चा सुरू होती. मात्र, पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी विधानसभेत उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना अन्न व औषध प्रशासन मंत्री ना. नरहरी झिरवाळ यांनी "तुकाराम मुंढे यांची बदली करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही" अशी स्पष्ट ग्वाही दिल्याने या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. पावसाळी अधिवेशन २०२६ दरम्यान आमदार काशिनाथ दाते यांनी राज्यातील वाढत्या भेसळीच्या प्रकारांकडे सरकारचे लक्ष वेधले. मे आणि जून महिन्यात अन्न व औषध प्रशासन विभागाने राज्यभर टाकलेल्या धाडीत भेसळयुक्त दूध, दुग्धजन्य पदार्थ, खाद्यतेल, पेढा, गुळ, चहा पावडर, आंबा पिकविण्याची पावडर, गुटखा, तंबाखू, सुगंधी सुपारी, मावा तसेच इतर निकृष्ट दर्जाच्या अन्नपदार्थांचा कोट्यवधी रुपयांचा साठा जप्त करण्यात आल्याचा मुद्दा त्यांनी सभागृहात मांडला. तसेच अशा कारवायांमुळे विभागाचा दबदबा वाढला असून राज्यातील भेसळ माफियांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे त्यांनी नमूद केले.

# आबासाहेब काकडे यांचा १०७ वा जयंती कार्यक्रम उत्साहात



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

आज दि.२५ रोजी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे संस्थापक कर्मयोगी जगन्नाथ कान्होजी उर्फ आबासाहेब काकडे यांचा १०७ वा जयंती कार्यक्रम अहिल्यानगर शहरातील जिल्हा सहकार बँक समोरील श्री संत गाडगे महाराज छात्रालय, येथे मोठ्या उत्साहात पार पडला. शहरामध्ये वस्तीगृहाचे अधीक्षक बाबासाहेब पातकळ यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी तुकाराम विघ्ने,राहुल लबडे उपस्थित होते. वस्तीगृहाचेअधिक्षक बाबासाहेब पातकळ म्हणाले की, आबासाहेबांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शाळा, सुरू केल्या परंतु ग्रामीण भागातील मुलांना राहण्याची जेवणाची व्यवस्था नसल्यामुळे आबासाहेबांनी वसतिगृहे सुरू केली. आबासाहेबांनी वसतिगृहातील मुलांच्या जेवणा साठी गावागावातून धान्य गोळा करण्याचे काम करून त्यांनी मुलांना शिक्षण दिले. आबासाहेबांनी शेवगाव आणि पाथर्डी तालुक्यातील शेतकऱ्यांना पाणी मिळावे यासाठी त्यांनी मोठा लढा उभारुन शासकीय स्तरावर नोंद करून ताजनापूर लिफ्ट ही योजना मंजूर करून घेतली व ती प्रत्यक्षात आणण्याचे काम त्यांचे चिरंजीव ॲड शिवाजीराव काकडे यांनी आज प्रत्यक्षात आणली . शिवसेना नेते ॲड. शिवाजीराव काकडे , शिवसेना नेत्या सौ.हर्षदा काकडे हे दाम्पत्य शेवगाव-पाथर्डी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी पिण्यासाठी पाणी व शेतीसाठी पाणी , गावागावात चांगले रस्ते रस्ते, गावागावात वाडीवस्त्यावरती लाईट मिळवण्यासाठी दिवस रात्र काम करत आहेत ते आबासाहेबांचा वारसा पुढे चालवत आहेत असे श्री बाबासाहेब पातकळ यांनी आपल्या मनोगत मध्ये सांगितले.

# तरुणांनी घेतली नशामुक्त भारत अभियानाची शपथ

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा येथील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'नशामुक्त भारत अभियान – विकसित भारत की पहचान' या उपक्रमांतर्गत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन २५ जून २०२६ रोजी करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी होते. त्यांनी उपस्थित शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालकांना मार्गदर्शन करताना नशामुक्त भारत अभियानाचे महत्त्व अधोरेखित केले.




भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयामार्फत राबविण्यात येणारा हा व्यापक उपक्रम असून, देशातील तरुणाई व नागरिकांना व्यसनांच्या विळख्यातून मुक्त करणे हा त्याचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना प्राचार्य सूर्यवंशी यांनी संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या सर्व शाखांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. सशक्त, जागरूक आणि जबाबदार भारतीय नागरिक घडविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात हिंदी विभाग प्रमुख प्रा. एस. आर. रसाळ यांनी अभियानाची उद्दिष्टे उपस्थितांसमोर मांडली आणि सर्वांना नशामुक्तीची शपथ दिली. कार्यक्रमाची प्रस्तावना एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. एस. भोस यांनी केली. या प्रसंगी कला शाखा प्रमुख प्रा. बी. एन. महारनुर, विज्ञान शाखा प्रमुख डॉ. एम. डी. सूर्यवंशी, एनसीसी अधिकारी डॉ. एस. डी. चोरमले यांच्यासह विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. वाय. आर. अहिरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# नाशिकला गोमाता संवाद यात्रेचे स्वागत



नाशिक : (स. गांवकरी)

पशुसंवर्धन विभाग आणि महाराष्ट्र गो सेवा आयोगातर्फे राज्यमाता गोसंवाद यात्रा काढण्यात आली आहे. ही यात्रा आज नाशिक शहरात होती. या यात्रेचे नागरिकांनी स्वागत केले. दुपारनंतर गोमाता संवाद यात्रा ठाणे जिल्ह्याकडे रवाना झाली. यानिमित्त शहरातील गुरू दक्षिणा सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आमदार दिलीप बनकर अध्यक्षस्थानी होते. गोमाता आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा, सदस्य सचिव डॉ. श्यामकांत पाटील, पशुसंवर्धन विभागाचे सहआयुक्त डॉ. बाबूराव नरवडे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. संजय शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते गोशाळा चालकांचा सत्कार करण्यात आला.

आमदार श्री. बनकर म्हणाले की, गोमाता संवाद यात्रा उपक्रम अतिशय चांगला आहे. गोशाळासाठी राज्य शासन मदत करीत आहे. गोशाळेच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील. आयोगाचे अध्यक्ष श्री. मुंदडा म्हणाले की, गोमातेचे महत्व सर्वत्र आहे. ग्रामीण भागात पूर्वी पहिली भाकरी गायीचा नैवेद्य म्हणून काढली जात असे. राज्य शासनाच्या माध्यमातून गोमातेच्या संवर्धनासाठी अनुदान देण्यात येते.

# पुरवठा विभागाच्या पेशकाराविरुद्ध रेशन दुकानदारांचे जिल्हाधिकाऱ्यांकडे आरोप

## पेशकार मारोती पाटील यांच्या तात्काळ बदली व निलंबनाची रास्त भाव दुकानदार संघटनेची आक्रमक मागणी

बिलोली : (स. गांवकरी)




बिलोली येथील तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाचे पेशकार मारोती पाटील यांच्याकडून रास्त भाव दुकानदारांची मोठ्या प्रमाणावर पिळवणूक, पैशांची बेकायदेशीर मागणी आणि मानसिक छळ केला जात असल्याचा खळबळजनक आरोप 'रास्त भाव दुकानदार संघटना, तालुका बिलोली' च्या वतीने करण्यात आला आहे. या संदर्भात संघटनेने थेट माननीय विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर, जिल्हाधिकारी नांदेड तहसीलदार बिलोली,यांना लेखी निवेदन देऊन पेशकार पाटील यांच्या तात्काळ निलंबनाची आणि बदलीची मागणी केली आहे. प्रशासनाला दिलेल्या निवेद्रात दुकानदारांनी पेशकार मारोती पाटील यांच्या कामकाजावर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. निवेदनानुसार, पेशकार पाटील हे कोणत्याही अधिकृत शासकीय कामासाठी, शासकीय नियमांचे उघड उल्लंघन करून दुकानदारांकडे उघडपणे पैशांची (लाचेची) मागणी करतात. पैसे न दिल्यास संबंधित दुकानदाराचे काम वेळेत न करणे, फाईल महिनोनमहिने अडवून ठेवणे आणि कामामध्ये जाणीवपूर्वक क्लिष्ट अडथळे निर्माण करून दुकानदारांना नाहक हेलपाटे मारायला लावणे हा त्यांचा नित्यक्रम बनला आहे. यामुळे प्रामाणिक दुकानदार पुरते हैराण झाले आहेत यांच्या या जाचक त्रासाला राशन दुकानदार कंटाळले असून पुरवठा विभागातून मारुती पाटील यांची हकालपट्टी करण्याची मागणी होत आहे. केवळ स्वतःचा आर्थिक स्वार्थ साधण्यासाठी आणि दुकानदारांवर वचक ठेवण्यासाठी वादग्रस्त पेशकार पाटील यांनी एक वेगळेच मानसिक दबाव तंत्र सुरू केले आहे. "तुमच्या दुकानाची शासकीय चौकशी लावेन", "तुमचे दुकान कायमचे निलंबित करून परवाना कायमचा रद्द करेन" अशी थेट धमकी ते प्रत्येक भेटीत देतात. शासकीय अधिकारांचा असा बेकायदेशीर दुरुपयोग करून त्यांनी दुकानदारांमध्ये भीतीचे साम्राज्य निर्माण केले आहे. यामुळे अनेक दुकानदार प्रचंड मानसिक तणावाखाली वावरत असून त्यांच्या आरोग्यावर याचा अत्यंत विपरित परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, पेशकार मारोती पाटील यांचे वर्तन कोणत्याही सुसंस्कृत शासकीय कर्मचाऱ्याला शोभणारे नाही. कार्यालयात येणाऱ्या रास्त भाव दुकानदारांशी ते अत्यंत उद्धट, उर्मट आणि अहंकारयुक्त भाषेत बोलतात. जाहीरपणे दुकानदारांचा अपमान करणे, त्यांना हीन वागणूक देणे यामुळे प्रशासकीय शिस्तीचा बोजवारा उडाला आहे. "माझे वरिष्ठ स्तरावर संबंध आहेत, माझे कोणी काही करू शकत नाही" अशा अविर्भावात ते वागत असल्याने दुकानदारांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. रेशन दुकानदार हे शासनाचाच एक महत्त्वाचा दुवा म्हणून तळागाळातील गरीबांपर्यंत आणि गरजूंपर्यंत अन्नधान्य पोहोचवण्याचे अत्यंत पवित्र काम करतात.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)



अहिल्यानगर मधील धनगर गल्लीत अचानक पुरातन वृक्षाची मोठी फांदी तुटली व ३ गाड्याचे नुकसान झाले सुदैवाने जीवितहानी झाली नाही यावेळी नगरसेवक डागवाले तत्परतेने मदतीला धावले व पडलेला लाइट पोल नवीन उभारून व झाडाची कटिंग स्वतः उभे राहून करून घेतली.

## थोडक्यात पण महत्वाचे



### दि. ३, ४ व ५ जुलैला महिला व व्यवसाय, उद्योजकासाठी प्रदर्शन

अहिल्यानगर (स. गांवकरी) : अहिल्यानगर येथील प्रतिबिब संस्थेच्या वतीने अधिकन उद्योजकता वाढविण्यासाठी व छोटे व्यावसायिक,उद्योजकाच्या सक्षमीकरणा साठी प्रदर्शन आयोजित केले असून ज्यात छोट्या व्यावसायिकांना तसेच मध्यम व्यवसायिकांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येत आहे. दि. ३,४ व५ जुलै २०२६ रोजी ३ दिवसीय प्रदर्शन शमी गणपती कार्यालय, दिल्लीगेट, अहिल्यानगर येथे सकाळी १० ते रात्री १० यावेळेत सर्वासाठी खुले असणार आहे,यामध्ये विविध प्रकारचे सुमारे ३० स्टोलचे नियोजन आहे.सर्व व्यावसायिक,गृह उद्योजक या प्रदर्शनातील स्टॉलमध्ये सहभागी होऊ शकतात. स्टॉलची बुकिंग करण्यासाठी व अधिक माहितीसाठी खालील नंबर वर कॉन्टॅक्ट करावा,स्टॉल बुक करण्याची अंतिम तारीख १ जुलै आहे.संपर्क-प्रतिबिब संस्था 9284930674,अनुजा कांबळे 9850262595,जयश्री सूळ 9890615000,ऋतुजा धोत्रे 9405101356 ,प्रिया भागवत 8830656834 यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

### पडघ्यात व्हॉट्सॲप डीपी स्कॅमचा धुमाकूळ; पैशांची मागणी

भिवंडी (स. गांवकरी) : भिवंडी तालुक्यातील पडघा परिसरात सध्या व्हॉट्सॲप डीपी (Display Picture) स्कॅमने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले आहे. अज्ञात सायबर भामटे स्थानिक दुकानदारांचे फोटो वापरून त्यांच्या नावाने व्हॉट्सॲप वर फोटो ठेऊन , ओळखीच्या ग्राहक व मित्रमंडळींकडे ऑनलाइन पैशांची मागणी करत असल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. गेल्या तीन दिवसांत पडघा परिसरातील अनेक दुकानदारांना या फसवणुकीचा फटका बसल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भामटे प्रथम परिसरातील दुकानदारांचे मोबाईल क्रमांक मिळवतात. त्यानंतर संबंधित दुकानदारांचे सोशल मीडिया किंवा व्हॉट्सॲपवरील फोटो डाउनलोड करून नवीन क्रमांकावर प्रोफाइल फोटो म्हणून वापरतात. त्यानंतर दुकानदारांच्या परिचित व्यक्तींना किंवा ग्राहकांना संदेश पाठवून तातडीची गरज असल्याचे सांगत क्यूआर कोड पाठवून पैसे मागितले जातात. या प्रकारामुळे अनेक नागरिकांची फसवणूक होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. काही ग्राहकांनी संबंधित व्यक्तीला ओळखीचा दुकानदार समजून पैसे पाठवल्यानंतर त्यांना फसवणुकीची जाणीव झाली. त्यामुळे परिसरात चिंता व्यक्त केली जात आहे.

### दिव्यात वाहनावर बनावट नगरसेवक, पोलीस आणि प्रेस लोगोचा सुळसुळाट



ठाणे (स. गांवकरी) :दिवा शहरात अनेक चारचाकी व दुचाकी वाहनांवर बेकायदेशीरपणे 'प्रेस', 'पोलीस' तसेच 'नगरसेवक' असे लोगो लावून काही वाहने सर्रास फिरत असल्याचे समोर आले आहे. संबंधित व्यक्तींकडे कोणतेही अधिकृत ओळखपत्र अथवा परवानगी नसतानाही अशा प्रकारे लोगोचा वापर केला जात असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. समाजसेवकांच्या मते अशा बनावट लोगोचा वापर करून काही जण स्वतःचा प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. यामुळे सर्वसामान्य नागरिकांची दिशाभूल होत असून अनेकदा फसवणूक होण्याची शक्यता निर्माण होते. तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करूनही अशा वाहनचालकांकडून दादागिरी केल्याच्या तक्रारीही अधूनमधून समोर येत आहेत. पत्रकार नसताना 'प्रेस', पोलीस खात्याशी कोणताही संबंध नसताना 'पोलीस' तर लोकप्रतिनिधी नसताना 'नगरसेवक' असे लोगो वाहनांवर लावणे हा कायद्याचा भंग असून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिक आणि समाजसेवकांकडून करण्यात येत आहे. दिवा शहरातील अशा वाहनांची तपासणी करून बनावट लोगो वापरणाऱ्यांविरोधात दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई करावी तसेच अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी विशेष मोहीम राबवावी अशी मागणी प्रशासन आणि वाहतूक पोलिसांकडे करण्यात आली आहे.

### समाजसेवा पुरस्काराने नंदकुमार वडगावकर यांचा गौरव!



पुणे (स. गांवकरी) : राष्ट्रभक्ती परिवार, पुणे यांच्या वतीने सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे आळंदी देवाची येथील समाजसेवक श्री. नंदकुमार वडगावकर यांना समाजसेवा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पुणे येथील पत्रकार भवन येथे २१ जून २०२६ रोजी आयोजित विशेष कार्यक्रमात विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात बिग बॉस मराठी फेम श्री. अभिजीत बिचुकले यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच राष्ट्रभक्ती परिवारचे श्री. सुनील गोरे आणि प्रसिद्ध सायकलपटू श्री. बेलगावकर यांच्या हस्ते श्री. वडगावकर यांना सन्मानपत्र, राष्ट्रभक्तीची तिरंगी शाल आणि पदक प्रदान करून गौरविण्यात आले. श्री. नंदकुमार वडगावकर हे सामाजिक कार्य, रुग्णसेवा, वृक्षारोपण, रक्तदान, जनजागृती आदी विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत असून त्यांच्या समाजोपयोगी कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

# चालकांकडून ५ प्रवाश्यांचा जीवघेणा प्रवास

## वाहतूक पोलिसांकडून कारवाईची मागणी

ठाणे : (स. गांवकरी)

दिवा शहरातील वाढती लोकसंख्या आणि रेल्वे प्रवाशांची संख्या लक्षात घेता रिक्षा सेवा ही नागरिकांसाठी महत्त्वाची वाहतूक व्यवस्था बनली आहे. मात्र गेल्या काही महिन्यांपासून काही रिक्षाचालकांच्या मनमानी कारभारामुळे प्रवाशांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, तीन आसनी परवानगी असलेल्या रिक्षांमध्ये अनेक चालकांकडून चौथी व पाचवी सीट घेऊन प्रवाशांची वाहतूक केली जात आहे. विशेष म्हणजे अतिरिक्त प्रवासी घेत असतानाही भाड्यामध्ये कोणतीही सवलत दिली जात नसल्याची तक्रार प्रवाशांकडून केली जात आहे. त्यामुळे RTO परवानगी नसताना एखादा आपघात झाल्यास जबाबदार कोण...? अर्थात प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.

याशिवाय डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन दिले जात असताना काही रिक्षाचालकांकडून कॅशलेस पेमेंट स्वीकारण्यास नकार दिला जात असल्याचे प्रकार समोर येत आहेत. "स्कॅन कोड वापरत नाही, रोख पैसे असतील तरच बसा," अशा प्रकारचे उद्धट उत्तर प्रवाशांना दिले जात असल्याचा आरोप नागरिकांनी व्यक्त केला आहे. यामुळे प्रवासी आणि रिक्षाचालकांमध्ये अनेकदा वाद निर्माण होत असल्याचेही सांगितले जात आहे. स्थानिकांच्या मते, दिवा परिसरात स्वतंत्र वाहतूक पोलिसांची प्रभावी यंत्रणा नसल्याने नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई



होत नाही. त्यामुळे रिक्षा युनियन आणि संबंधित प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे नागरिकांचे मत आहे. दरम्यान, दिव्यात वाढत्या वाहतूक समस्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि रिक्षा वाहतुकीवर प्रभावी देखरेख ठेवण्यासाठी ठाणे वाहतूक पोलिसांनी दिवा येथे स्वतंत्र वाहतूक पोलीस विभाग अथवा चौकी सुरू करावी, अशी मागणी चाकरमानी दिवेकरांसह स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. नागरिकांच्या या मागणीकडे प्रशासन कितपत गांभीर्याने पाहते आणि प्रवाशांच्या समस्यांवर कोणती ठोस पावले उचलली जातात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पत्रकारांचा संजय दिना पाटील यांच्या विरोधात निषेध

सोलापूर : (स. गांवकरी)



खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांविषयी केलेल्या कथित वक्तव्याच्या निषेधार्थ सोलापूरातील पत्रकार संघटनांनी तीव्र आंदोलन छेडले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, आणि सोलापूर जिल्हा डिजिटल मीडिया यांच्या संयुक्त विद्यमाने निदर्शने करण्यात आली.

यावेळी पत्रकारांनी संजय दिना पाटील यांच्या वक्तव्याचा निषेध करत, त्यांनी लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला. पत्रकारांबाबत वापरण्यात आलेली भाषा ही अत्यंत आक्षेपार्ह आणि निंदनीय असल्याचे आंदोलकांनी म्हटले. आंदोलनादरम्यान पत्रकार प्रतिनिधींनी सांगितले की, लोकशाही व्यवस्थेत पत्रकार हे जनतेचा आवाज शासनापर्यंत पोहोचविण्याचे काम करतात. अशा परिस्थितीत एका खासदाराने पत्रकारांविषयी अवमानकारक भाषा वापरणे हे लोकशाही मूल्यांना धक्का देणारे आहे. पत्रकार संघटनांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन खासदार संजय दिना पाटील यांच्यावर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी केली. तसेच भविष्यात कोणत्याही लोकप्रतिनिधीकडून पत्रकारांचा अवमान होणार नाही यासाठी कठोर भूमिका घेण्याचे आवाहन करण्यात आले. या आंदोलनामुळे पत्रकारांमध्ये मोठ्या प्रमाणात संतापाचे वातावरण असून, पत्रकारांच्या सन्मानासाठी आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी संघर्ष सुरूच राहील, असा इशाराही संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

# आंतरशालेय योगासन स्पर्धेचे ११ जुलै रोजी आयोजन

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेतून २१ जून हा दिवस संपूर्ण जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. भारतीय संस्कृती व शास्त्रपरंपरेतील योगाचे अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये योगाची आवड निर्माण व्हावी, तसेच शालेय जीवनातच निरोगी व संतुलित जीवनशैलीची पायाभरणी व्हावी या उद्देशाने कै. विजया (ताई) शिवलकर आंतरशालेय योगासन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे यंदाचे तिसरे वर्ष असून, शनिवार, दि. ११ जुलै २०२६ रोजी ही स्पर्धा उत्साहात पार पडणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. शालेय जीवनात विविध स्पर्धांमधून विद्यार्थ्यांची सर्वांगीण जडणघडण होत असते. योगाच्या माध्यमातून शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकास साधण्याचा प्रयत्न



या स्पर्धेच्या माध्यमातून केला जात आहे. स्पर्धा इयत्ता चौथी ते सहावी आणि इयत्ता सातवी ते नववी अशा दोन गटांमध्ये घेण्यात येणार आहे. या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमासाठी 'योग विद्या धाम', अहिल्यानगर यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे. स्पर्धेचे ठिकाण 'पालवी शिशुविहार', शुभमंगल कार्यालय, भिडे हॉस्पिटलसमोर, सावेडी नाका, अहिल्यानगर असे असून, शहर व परिसरातील जास्तीत जास्त शाळांनी आपल्या विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# सावेडी डॉक्टर असोसिएशन व प्रिसिजन डायग्रोस्टिक यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

## विद्यार्थ्यांनी ध्येय ठेवून वाटचाल करावी व यशस्वी व्हावे- रोहित रामदिन

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

दहावी हा जीवनाचा महत्त्वपूर्ण टप्पा आहे.विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत चांगले गुण मिळवून शाळेच्या व आई-वडिलांच्या नावलौकिकात भर घातली आहे.या पुढील काळात डॉक्टर, वकील, इंजिनियर तसेच स्पर्धा परीक्षा देऊन पीएसआय, तहसीलदार, जिल्हाधिकारी असे अधिकारी बनण्याचे स्वप्न मुलांनी पहावे.विद्यार्थ्यांनी ध्येय ठेवून वाटचाल केल्यास जीवनात यशस्वी होतील.असे प्रतिपादन विद्यादान अकॅडमीचे रोहित रामदिन यांनी केले

सावेडी येथे डॉक्टर्स असोसिएशन व प्रिसिजन डायग्नोस्टिक यांच्या संयुक्त विद्यमाने सावेडीतील दहावीच्या परीक्षेत मेरीट मध्ये आलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ पार पाडला.



याप्रसंगी प्रिसिजन डायग्नोस्टिकचे संचालक डॉ.रणजीत सत्रे,प्रमुख पाहुणे म्हणून विद्यादान अकॅडमीचे रोहित रामदिन,डॉ. अतुल नरसाळे डॉ.शरद ठुबे,डॉ. सुशील नेमाने आदींसह डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष भगवान कराळे,उपाध्यक्ष डॉ.सुनील सचिव डॉ.नितीन झावरे, खजिनदार डॉ.सुरेंद्र खन्ना,इशेश सर उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ.रणजीत सत्रे म्हणाले, दरवर्षी सावेडी परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येतो.विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप द्यावी तसेच पुढील शिक्षणासाठी त्यांना मार्गदर्शन करावे या उद्देशाने सावेडी डॉक्टर असोसिएशन व प्रिसिजन डायग्नोस्टिकच्या वतीने सत्कार समारंभाचे आयोजन केले जाते.

डॉ. योगिता सत्रे यांनी योग दिनाचे महत्त्व सांगून प्रत्येकाने आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी. याविषयी मार्गदर्शन केले आणि योग प्रात्यक्षिक करून दाखवले.

तसेच डॉ.भगवान कराळे यांनी अभ्यासाचा सराव कसा करावा याविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात सत्कार झालेल्या दहावीच्या विद्यार्थ्यांची नावे कु.अनन्या हेमंत सोले -98%, कु.रचना रणजीत सत्रे-97%,,कु.मंजुषा महेश बोरकर 96.80% ,कु.अर्णव सुबोध देशमुख-92.6%.तसेच सकाळ बालनाट्यामहोत्सवमध्ये अभिनयाचे प्रथम पारितोषिक प्राप्त कु.आराध्या देविदास पतंगे यांचा सत्कार करण्यात आला.

# कोळगाव ग्रामीण रुग्णालयाच्या पदनिर्मितीचा मार्ग मोकळा

## सार्वजनिक आरोग्य विभागाचा अध्यादेश; लवकरच रुग्णालय कार्यान्वित होण्याची शक्यता




श्रीगोंदा : (स. गांवकरी)

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासनाने 24 जून 2026 रोजी राज्यातील 50 टक्क्यांहून अधिक बांधकाम पूर्ण झालेल्या नव्या आरोग्य संस्थांसाठी पदनिर्मितीबाबत अध्यादेश जारी केला आहे. या निर्णयामुळे कोळगाव येथील नव्याने उभारण्यात आलेल्या ग्रामीण रुग्णालयाच्या पदनिर्मितीचा मार्ग मोकळा झाला असून, लवकरच रुग्णालय कार्यान्वित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

शासनाच्या अध्यादेशानुसार राज्यातील 259 आरोग्य संस्थांसाठी एकूण 5,223 पदांची निर्मिती करण्यात येणार असून यासाठी सुमारे 320 कोटी रुपयांच्या खर्चाची तरतूद करण्यात आली आहे.

अध्यादेशात नमूद केल्यानुसार, ज्या आरोग्य संस्थांचे बांधकाम शंभर टक्के पूर्ण झाले आहे, त्या संस्थांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून इमारत रुग्णसेवेसाठी वापरण्यास योग्य असल्याचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच कर्मचाऱ्यांची नियुक्ती आणि रुजू प्रक्रिया करण्यात येणार आहे.

कोळगाव येथील ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीचे सुमारे 16 कोटी रुपयांचे बांधकाम पूर्ण झाले असून कर्मचारी निवासस्थानांसाठीच्या साडेपाच कोटी रुपयांच्या कामाचा अंतिम टप्पा सुरू आहे. शासनाच्या या निर्णयामुळे कोळगावसह परिसरातील 15 ते 20 गावांतील नागरिकांना अल्प दरात आणि जवळच वैद्यकीय सुविधा उपलब्ध होणार आहेत.

या ग्रामीण रुग्णालयास मंजुरी देण्यासाठी तत्कालीन आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी पुढाकार घेतला होता. तसेच माजी मंत्री बबनराव पाचपुते, माजी आमदार राहुल जगताप, श्रीगोंदा कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे, बँक संचालिका अनुराधा नागवडे, माजी उपसभापती बाळासाहेब नलगे, सरपंच पुरुषोत्तम लगड, सामाजिक कार्यकर्ते सुधीर लगड यांच्यासह अनेकांनी सातत्याने पाठपुरावा केला होता.

### मुंगूसगाव उपकेंद्रालाही दिलासा

कोळगाव ग्रामीण रुग्णालयाबरोबरच श्रीगोंदा तालुक्यातील मुंगूसगाव येथील आरोग्य उपकेंद्रासाठी चार पदांच्या निर्मितीचा मार्गही मोकळा झाला आहे. त्यामुळे मुंगूसगाव येथील उपकेंद्रही लवकरच कार्यान्वित होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# शालेय साहित्यांच्या भेटीने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

श्रीगोंदा : (स. गांवकरी)



अग्नीपंख फाउंडेशनच्या वतीने ढवळगाव येथील संत ज्ञानेश्वर विद्यालयातील उपेक्षित कुटुंबांतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. मुलांपेक्षा मुलींची संख्या अधिक असलेल्या या विद्यालयातील विद्यार्थ्यांना साहित्य भेट मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि हास्य फुलले. बुधवारी ढवळगाव येथे आयोजित कार्यक्रमात उद्योजक गणेश साळुंके, विकास आढाव आणि अनिरुद्ध लाकुडझोडे यांच्या हस्ते शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी अंकुश कऱ्हे आणि प्रतीक्षा रोटकर यांची पोलीस कॉन्स्टेबलपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना विकास आढाव म्हणाले, "आई-वडिलांच्या सल्ल्यानुसार आणि मार्गदर्शनानुसार काम केल्यास जीवनात यश निश्चित मिळते. माझे वडील निरक्षर असले तरी त्यांचे मार्गदर्शन माझ्यासाठी लाखमोलाचे ठरले. यापुढेही अग्नीपंख फाउंडेशनच्या शैक्षणिक उपक्रमांना माझे सहकार्य राहील." गणेश साळुंके यांनी समाजसेवेची प्रेरणा वडिलांकडून मिळाल्याचे सांगत अशा उपक्रमांमध्ये सहभागी होण्याचे समाधान व्यक्त केले. अग्नीपंख फाउंडेशनचे अध्यक्ष मोहन आढाव म्हणाले, "शाळा आणि विद्यालये ही समाजपरिवर्तनाची प्रभावी माध्यमे आहेत. त्यांना मदत करणे हेच फाउंडेशनचे ध्येय आहे. लवकरच शिक्षकांसाठी मोटिव्हेशन कॅम्प तसेच विद्यार्थी आणि खेळाडूंसाठी महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे."

# सर्वसमावेशक लैंगिकता शिक्षण विषयक प्रशिक्षण

(स. गांवकरी)

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया (एफपीएआय), सोलापूर शाखेच्या वतीने यंग पीपल प्रोग्राम अंतर्गत नेटवर्किंग स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींसाठी "सर्वसमावेशक लैंगिकता शिक्षण" (Comprehensive Sexuality Education - CSE) या विषयावरील प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणाचा उद्देश किशोरवयीन मुला-मुलींच्या आरोग्य, सुरक्षितता व सर्वांगीण विकासासाठी कार्यरत संस्थांमध्ये समन्वय वाढविणे आणि सीएसई विषयक प्रभावी जनजागृती करणे हा होता. या प्रशिक्षणाचे मार्गदर्शन शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, सामाजिक कार्यकर्त्या कल्पना गडगडे, क्षेत्रीय कार्यकर्त्या




श्रुती कोल्हापुरे तसेच परिचारिका स्नेहा जटाळा यांनी केले.

कार्यक्रमात बालकल्याण समिती, सोलापूर जिल्हा, निरामय आरोग्यधाम एफ.एस.डब्ल्यू टार्गेटेड इंटरव्हेन्शन प्रकल्प, एम.एस.एम/टी.जी. टार्गेटेड इंटरव्हेन्शन प्रकल्प, सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समितीचा स्थलांतरित व ट्रकर्स प्रकल्प, नेटवर्क ऑफ सोलापूर बाय पीपल लिव्हिंग विथ एचआयव्ही/एड्स (समग्र प्रकल्प), श्रीमती गोपाबाई दामाणी रक्तसंकलन केंद्र, डॉ. हेडगेवार रक्तपेढी, चाईल्डलाईन 1098 आणि सखी वन स्टॉप सेंटर या संस्थांच्या प्रतिनिधींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रारंभी सुगतरत्न गायकवाड यांनी विविध नेटवर्किंग संस्थांमधील समन्वयाचे महत्त्व स्पष्ट करून यंग पीपल प्रोग्राम आणि सर्वसमावेशक लैंगिकता शिक्षण कार्यक्रमाची उद्दिष्टे व अपेक्षित परिणाम याविषयी सविस्तर माहिती दिली. युवक-युवतींना वैज्ञानिक, अचूक व वयाला अनुरूप माहिती उपलब्ध करून देण्यासाठी स्वयंसेवी संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

कल्पना गडगडे यांनी सी.एस.ई. विषयाची ओळख करून देताना किशोरावस्था व त्यातील शारीरिक, मानसिक आणि भावनिक बदल, वैयक्तिक स्वच्छता, मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापन, पौष्टिक आहार, एचआयव्ही/एड्स प्रतिबंध, कर्करोग जनजागृती तसेच बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण (POCSO) कायदा यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन केले. तसेच एफ.पी.ए.आय सोलापूर शाखेमार्फत शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमध्ये नेटवर्किंग संस्थांच्या सहभागाची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

श्रुती कोल्हापुरे यांनी सायबर गुन्हे, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) चे फायदे व संभाव्य धोके, बालकल्याण आणि बालसंरक्षण यांसंदर्भात नेटवर्किंग संस्थांची भूमिका स्पष्ट केली. बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात किशोरवयीन मुलांमध्ये डिजिटल साक्षरता आणि सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. बैठकीदरम्यान सहभागी संस्थांच्या प्रतिनिधींनी एफ.पी.ए.आय सोलापूर शाखेच्या यंग पीपल प्रोग्राममध्ये सक्रिय सहभाग नोंदविण्याची तयारी दर्शविली. भविष्यात आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रम, जनजागृती उपक्रम आणि शैक्षणिक सत्रांमध्ये सहभागी होण्याबरोबरच प्रत्येक संस्थेने आपल्या तज्ज्ञतेनुसार किमान एक सत्र आयोजित करण्याचे आश्वासन दिले. या प्रशिक्षणादरम्यान विविध स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींशी सीएसई कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भात चर्चा करण्यात आली. या चर्चेमुळे परस्पर समन्वय अधिक बळकट होण्यास मदत झाली तसेच किशोरवयीन मुलांमध्ये सर्वसमावेशक लैंगिकता शिक्षणाचे महत्त्व पोहोचविण्यासाठी संयुक्त प्रयत्नांची दिशा निश्चित झाली.

# थोडक्यात पण महत्वाचे

## डायनॅमिक भारत २०४७ : श्री. निलेश ओक यांचे व्याख्यान २८ जून रोजी




पुणे (स. गांवकरी) : भारताच्या प्राचीन इतिहासाचा अभ्यास आणि त्यातून भविष्यातील भारताची दिशा याविषयी मार्गदर्शन करणारे "डायनॅमिक भारत २०४७" हे विशेष व्याख्यान रविवारी, २८ जून २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता कर्वेनगर येथील पंडित फार्म्स, डी.पी. रोड येथे आयोजित करण्यात आले आहे. नागरिक सोशल फाउंडेशन आणि ॲम्बिशन्स कॉमर्स इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात प्राचीन इतिहासाचे अभ्यासक व संशोधक निलेश ओक मार्गदर्शन करणार आहेत. रामायण आणि महाभारत ही केवळ महाकाव्ये किंवा काल्पनिक कथा नसून ती भारतीय इतिहासाच्या प्रदीर्घ परंपरेचा भाग असल्याचा दृष्टिकोन मांडत, इतिहासाचे चिंतन वर्तमान आणि भविष्य घडविण्यासाठी कसे उपयुक्त ठरू शकते यावर ते भाष्य करणार आहेत.

## सॅमसंग कडून स्मार्ट एअर केअर आणि विंडफ्री क्लायमेट सोल्यूशन्स सादर

पुणे (स. गांवकरी) : सॅमसंग ने आपल्या पुढील पिढीतील निवासी क्लायमेट सोल्यूशन्सच्या तैनातीची घोषणा केली. या सोल्यूशन्समध्ये WindFree™ कूलिंग, PM1.0 शुद्धीकरण, SmartThings कनेक्टिव्हिटी आणि AI-सक्षम VRF तंत्रज्ञानाचा समावेश असून, ते भारतातील प्रीमियम जीवनशैलीचा अनुभव नव्याने परिभाषित करतात. भारतातील शहरी भागांमध्ये वाढते तापमान आणि खालावणारी हवेची गुणवत्ता या वाढत्या समस्यांचा विचार करून सॅमसंग ने हे एकात्मिक इकोसिस्टम विकसित केले आहे. हे ग्राहकांच्या आरोग्य, घरातील हवेची गुणवत्ता, कनेक्टेड लिव्हिंग आणि ऊर्जा कार्यक्षमतेच्या गरजा पूर्ण करते. "सॅमसंग मध्ये आमचे नवोपक्रम तत्त्वज्ञान ग्राहकांच्या वास्तविक गरजा आणि दैनंदिन जीवनातील आव्हाने समजून घेण्यापासून सुरू होते. आजचे घरमालक केवळ पारंपरिक कूलिंगच्या पलीकडे जाऊन अधिक आरोग्यदायी हवा, कनेक्टेड अनुभव, बुद्धिमान ऊर्जा व्यवस्थापन आणि अधिक आरामाची अपेक्षा करतात. आमची WindFree™ क्लायमेट सोल्यूशन्स स्थानिक परिस्थितीसाठी विशेषतः अनुकूलित आहेत आणि ही सर्व वैशिष्ट्ये एका एकात्मिक इकोसिस्टममध्ये एकत्र आणतात, जे Samsung साठी वैशिष्ट्यपूर्ण आहे," असे सॅमसंग इंडिया च्या SAC व्यवसाय विभागाचे प्रमुख विपिन अगरवाल यांनी सांगितले.

## नवी कोरी मिनी कंट्रीमॅन सी भारतात सादर



चेन्नई (स. गांवकरी) : आधुनिक पिढीची कंट्रीमॅन आता "मेड इन इंडिया" म्हणजेच भारतात निर्मिली जाणारी आणि स्थानिक पद्धतीने याचा पेट्रोल वेरियंटची निर्मीती ही बीएमडब्लू ग्रुपच्या भारतात नव्या मिनी कंट्रीमॅन सी चे सादरीकरण करण्यात आले आहे. या गाडीचे उत्पादन चेन्नई येथील प्लान्टमध्ये केले जाणार आहे. कारची बुकिंग ही सगळ्या मिनी इंडियाच्या आधिकृत डिलर्सकडे करता येईल आणि त्याचा डिलिवरीज देखील अगदी लगेच सुरू करण्यात येतील. या कारमध्ये आत्याधुनिक मिनी ट्वीनपॉवर टर्बो तंत्रज्ञान तसेच दमदार गो-कार्ट फीलचा ट्रेडमार्क आणि पेट्रोल इंजिन चालविण्याचा एक विशेष अनुभव मिळणार आहे. तीन वर्षांनंतर देखील ६६% पर्यंतची या श्रेणीतील सर्वोत्तम बायबॅक किंमत ची हमी कंपनीकडून दिली जाणार आहे. स्टयालिश अशा "फेवर्ड पॅक" मध्ये उपलब्ध, नव्या कोऱ्या मिनी कंट्रीमॅन सी ची एक्स-शोरूम किंमत ही भारतीय चलनात ४७,५०,००० एवढी असेल. श्री. हरदीप सिंग ब्रार, बीएमडब्लू ग्रुप इंडियाचे अध्यक्ष आणि सीईओ यावेळी बोलताना म्हणाले, " नवी कोरी मिनी कंट्रीमॅन सी ही आपल्या काळातील एक बिग (भव्य) असा अनुभव देणारी गाडी आहे. ही गाडी पारंपारिक मिनी ला सुंदर पद्धतीने एका दमदार अशा एसयुव्ही मध्ये रूपांतरीत करते, या गाडीला एक बोल्ड लुक असून याची निर्मीती ही साहसी कौटुंबिक सहलींकरीता केली गेली आहे, पण त्याच बरोबर प्रतिष्ठित असा गो-कार्ट फिलिंगचा अनुभव देखील ग्राहकांना घेता येणार आहे. आम्हाला अभिमान आहे की गाडीची निर्मीती भारतात होणार असून, यामुळे आमचा उत्पादनांचा पोर्टफोलियोला धोरणात्मक बळकटी मिळेल आणि ग्राहकांना ती उत्तम किंमतीत उपलब्ध करून देता येऊ शकेल."

## कलर्स मराठीचा 'वटपौर्णिमा विशेष महासंगम' प्रेक्षकांच्या भेटीला




पुणे (स. गांवकरी) : कलर्स मराठीवरील लोकप्रिय मालिका 'मी जिंकून घेईन सारं' आणि 'मोहिनी – प्रेमाची फिल्मी कहाणी' यांचा बहुप्रतीक्षित 'वटपौर्णिमा विशेष महासंगम' प्रेक्षकांसाठी मनोरंजनाची अनोखी पर्वणी घेऊन येत आहे. २९ जून ते १ जुलै दरम्यान सलग तीन दिवस संध्याकाळी ७ वाजता प्रसारित होणाऱ्या या विशेष भागांमध्ये सणाचा उत्साह, कौटुंबिक नात्यांचे भावविश्व, रहस्य, थरार आणि नाट्यमय घडामोडींचा संगम पाहायला मिळणार आहे. वटपौर्णिमेच्या पवित्र सणाच्या पार्श्वभूमीवर उलगडणाऱ्या या कथानकात केवळ पारंपरिक वटपूजनच नव्हे, तर सुड, कारस्थानं आणि अनपेक्षित संकटांचे सावटही प्रेक्षकांना खिळवून ठेवणार आहे. 'कलर्स मराठीची आजची सावित्री' ही संकल्पना अधोरेखित करत, संकटांशी दोन हात करणाऱ्या आणि आपल्या कुटुंबासाठी खंबीरपणे उभ्या राहणाऱ्या स्त्रियांची प्रेरणादायी कथा या महासंगमातून उलगडणार आहे.

## फ्लिपकार्ट मिनिट्सचा दोन वर्षांत १,००० सूक्ष्म पूर्तता केंद्रांचा टप्पा

पुणे (स. गांवकरी) : देशातील आघाडीच्या ऑनलाइन विक्री व्यासपीठांपैकी एक असलेल्या फ्लिपकार्टच्या 'फ्लिपकार्ट मिनिट्स' या झटपट वितरण सेवेनं दोन वर्षांपेक्षा कमी कालावधीत १,००० सूक्ष्म पूर्तता केंद्रांचा टप्पा गाठला आहे. ऑगस्ट २०२४ मध्ये सुरू झालेली ही सेवा आता १३० हून अधिक शहरे आणि ८,००० पेक्षा जास्त टपाल क्रमांक क्षेत्रांपर्यंत पोहोचली असून, मागील वर्षाच्या तुलनेत मागण्यांमध्ये तब्बल पाचपट वाढ नोंदविण्यात आली आहे. कंपनीच्या माहितीनुसार, मोठ्या शहरांसह दुसऱ्या आणि तिसऱ्या श्रेणीतील शहरांमध्येही झटपट वितरण सेवेला मोठा प्रतिसाद मिळत आहे. विशेषतः या बाजारपेठांमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत ४२ पट वाढ नोंदवली गेली असून, नव्या शहरांमध्ये विस्तार आणि स्थानिक पातळीवरील उपलब्धता यामुळे या वाढीस चालना मिळाली आहे. फ्लिपकार्ट समूहाचे वरिष्ठ उपाध्यक्ष हेमंत बद्री यांनी सांगितले की, १,००० सूक्ष्म पूर्तता केंद्रांचा टप्पा गाठणे हा महत्त्वाचा टप्पा असला तरी त्याहून महत्त्वाचे म्हणजे देशभरातील ग्राहक झटपट वितरण सेवेचा मोठ्या प्रमाणावर स्वीकार करत आहेत. अधिक व्यापक पोहोच, अधिक पर्याय आणि सोयीसुविधांमुळे या क्षेत्राच्या वाढीला आणखी गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. फ्लिपकार्ट मिनिट्सचे प्रमुख कुणाल गुप्ता यांनी सांगितले की, दैनंदिन गरजांची पूर्तता करण्यासाठी सुरू झालेली सेवा आता लाखो ग्राहकांच्या खरेदीच्या सवयींचा भाग बनली आहे. ग्राहकांकडून फळे, भाज्या, आरोग्यविषयक उत्पादने, सौंदर्यप्रसाधने तसेच इलेक्ट्रॉनिक वस्तूंची मागणी सातत्याने वाढत आहे. फळे आणि भाज्यांच्या सरासरी खरेदी मूल्यात ३० टक्क्यांची वाढ झाली असून, पुनरावृत्ती होणाऱ्या खरेदीतही लक्षणीय वाढ दिसून आली आहे.

# कृषीपंप केबल चोरी करणाऱ्या आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश!

## १५० शेतकऱ्यांच्या केबल चोरीचे १२ गुन्हे उघड; पुणे ग्रामीण पोलिसांची मोठी कारवाई!

जुन्नर : (स. गांवकरी)




जुन्नर आणि आंबेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या कृषीपंपांच्या केबल वायर चोरी करून मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान करणाऱ्या आंतरराज्य टोळीला पुणे ग्रामीण पोलिसांनी अटक केली आहे. स्थानिक गुन्हे शाखा आणि नारायणगाव पोलीस स्टेशनच्या संयुक्त कारवाईत पाच आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्या चौकशीत सुमारे १५० शेतकऱ्यांच्या केबल चोरीशी संबंधित एकूण १२ गुन्हे उघडकीस आले आहेत.

मागील काही महिन्यांपासून जुन्नर, नारायणगाव, ओतूर आणि पारगाव परिसरात कृषीपंपांच्या केबल चोरीच्या घटना वाढल्या होत्या. ऐन उन्हाळ्यात सिंचनासाठी आवश्यक असलेल्या केबल चोरीमुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत होता. अनेक ठिकाणी पिकांचे नुकसान होत असल्याने शेतकरी चिंतेत होते.

या गुन्ह्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांनी स्थानिक गुन्हे शाखेला आरोपींचा शोध घेऊन गुन्हे उघड करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने समांतर तपास सुरू केला. तपासादरम्यान पथकाने विविध घटनास्थळांना भेटी दिल्या. घटनास्थळी मिळालेल्या बिड्या, विशिष्ट प्रकारच्या तंबाखूच्या पुड्या आणि पेयांच्या अवशेषांवरून सर्व चोरी एकाच टोळीकडून होत असल्याचा संशय पोलिसांना आला. तसेच या टोळीचा संबंध परराज्याशी असल्याचेही प्राथमिक तपासात स्पष्ट झाले. दरम्यान, गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांना मध्य प्रदेशातील काही आरोपी अशा प्रकारच्या चोऱ्यांमध्ये सक्रिय असल्याची माहिती मिळाली. हे आरोपी चोरीच्या ठिकाणांच्या आसपास वास्तव्यास राहून रात्रीच्या वेळी गुन्हे करत असल्याचे समोर आले. तसेच संबंधित आरोपी सध्या नाशिक जिल्ह्यातील घोटी-इगतपुरी परिसरात असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली.

या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखा आणि नारायणगाव पोलिसांच्या पथकाने घोटी येथे सापळा रचून पाच संशयितांना ताब्यात घेतले. चौकशीत आरोपींनी केबल चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये आरज्या छत्तेसिंग पवार (वय १९), गगन शापिलाल चौहान (वय १९), अतुल शापिलाल चौहान (वय २१), तपसलाल सर्कस पवार (वय ५०) आणि सुरज रामसर आदिवासी (वय ४०) यांचा समावेश आहे. सर्व आरोपी मध्य प्रदेश राज्यातील रहिवासी आहेत.

पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून मोठ्या प्रमाणात चोरीस गेलेल्या केबल जप्त केल्या आहेत. या कारवाईमुळे जवळपास १५० शेतकऱ्यांच्या केबल चोरीशी संबंधित जुन्नर, नारायणगाव, ओतूर आणि पारगाव परिसरातील एकूण १२ गुन्हे उघडकीस आले आहेत. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

सध्या आरोपी नारायणगाव पोलीस स्टेशनच्या कोठडीत असून त्यांच्याकडून आणखी काही गुन्ह्यांची माहिती समोर येण्याची शक्यता आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

ही उल्लेखनीय कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक शुभम कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे आणि धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या मोहिमेत सपोनि. महादेव शेलार, सपोनि. प्रविण सपांगे, सहायक फौजदार दीपक साबळे तसेच स्थानिक गुन्हे शाखा आणि नारायणगाव पोलीस स्टेशनच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# कै. लक्ष्मीबाई यशवंत बागुल यांचे दुःखद निधन

कनाशी : (स. गांवकरी)



■ गंगापूर परिसरावर शोककळा

कळवण तालुक्यातील गंगापूर, येथील रहिवासी कै. लक्ष्मीबाई यशवंत बागुल यांचे दिनांक २४ जून रोजी रात्री अल्पशा आजाराने आकस्मिक निधन झाले. त्या सप्तशृंगी कृषी सेवा केंद्र कनाशी निवृत्ती बागुल व दिलीप बागुल यांच्या मातोश्री होत. लक्ष्मीबाईंचा स्वभाव अत्यंत मनमिळाऊ व प्रेमळ होता. आयुष्यभर त्यांनी कधीही कुणाचे वाईट चिंतले नाही, कुणाशी वैर केले नाही. शून्यातून संसार उभा करताना त्यांनी अपार कष्ट सोसले. त्यांच्या त्यागातून व संस्कारातूनच आज बागुल कुटुंबाचा वटवृक्ष बहरला आहे. मात्र काळाने रात्री अचानक घाला घातला आणि त्यांचा जीवनप्रवास इथेच थांबला. त्यांच्या अकाली जाण्याने गंगापूरसह संपूर्ण कनाशी परिसरावर शोककळा पसरली आहे. गावातील प्रत्येक घरात त्यांच्याबद्दल हळहळ व्यक्त होत आहे. सर्वांशी आपुलकीने वागणाऱ्या, सुख-दुःखात धावून जाणाऱ्या माऊलीच्या जाण्याने परिसर पोरका झाला आहे. त्यांच्या पश्चात पती दोन मुलं एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. परमेश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती देवो व बागुल परिवारास या दुःखातून सावरण्याचे बळ देवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

# कनाशी परिसरातील मेडिकल दुकानांत 'डिग्री'चा अभाव

■ दहावी-बारावी झालेले देताहेत औषधे
■ अशिक्षितांचा गैरफायदा, चुकीच्या गोळ्यांमुळे जीवावर बेतण्याची भीती
■ आरोग्य विभागाचे दुर्लक्ष

कनाशी : (स. गांवकरी)



आदिवासीबहुल कनाशी परिसरात मेडिकल दुकानांचा सावळा गोंधळ समोर आला आहे. नियमाप्रमाणे औषध विक्रीसाठी D.Pharm किंवा B.Pharm पदवी व फार्मासिस्ट कौन्सिलची नोंदणी बंधनकारक आहे. मात्र कनाशी व आसपासच्या अनेक मेडिकल दुकानांत फार्मसी डिग्रीधारक फक्त नावालाच आहेत. मात्र दहावी-बारावी झालेले, काही ठिकाणी त्याहीपेक्षा कमी शिकलेले कर्मचारीच सर्रास औषधे देत असल्याच्या तक्रारी नागरिक करताहेत. कनाशी हा आदिवासीबहुल भाग असून येथे मोठ्या प्रमाणात निरक्षर व अल्पशिक्षित नागरिक आहेत. डॉक्टरांच्या चिठ्ठीविना, केवळ लक्षण सांगून औषध मागणाऱ्या या नागरिकांना अपुऱ्या ज्ञानावर गोळ्या दिल्या जातात. डिग्री नाही, अनुभवावर देतो" असे सांगत अनेक दुकानदार ॲन्टिबायोटिक, स्टेरॉइड, पेनकिलर सारखी औषधे बिनधास्त देत आहेत. चुकीचे औषध, चुकीचा डोस यामुळे दुष्परिणाम होऊन रुग्ण दगावण्याची भीती नागरिकांमध्ये आहे. या गंभीर प्रकाराबाबत तालुका आरोग्य अधिकारी, प्रशासनाकडे अनेकदा तोंडी तक्रारी केल्या. मात्र कारवाई करू असे आश्वासन देण्यापलीकडे स्थानिक प्रशासनाने आजपर्यंत एकाही मेडिकलधारकावर ठोस कारवाई केली नाही. प्रशासन झोपेचे सोंग घेत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी जळगाव जिल्ह्यात बोगस फार्मासिस्ट व विनापरवाना मेडिकल दुकानांवर धडक कारवाईचा बडगा उचलला आहे. डझनभर दुकाने सील करून परवाने रद्द केले आहेत. मात्र कनाशी अभोना -कळवण भागात अद्याप मुंढे पॅटर्न दिसत नाही. स्थानिक औषध निरीक्षक व आरोग्य विभागाचे अधिकारी कारवाई करणार का, असा सवाल नागरिक विचारत आहेत. डिग्री नसलेल्या कर्मचाऱ्याने दिलेल्या चुकीच्या गोळीमुळे एखाद्याचा जीव गेला, अपंगत्व आले तर त्याला जबाबदार कोण? दुकानदार, मालक की कारवाई न करणारे अधिकारी? असा खडा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. रुग्णांचे प्रिस्क्रिप्शन न पाहता, केवळ नफ्यासाठी औषधे देण्याचा प्रकार सर्रास सुरू आहे. कनाशी अभोना परिसरातील सर्व मेडिकल दुकानांची तातडीने तपासणी करावी. परवाना, फार्मासिस्टची मूळ डिग्री, तो प्रत्यक्ष हजर आहे का, याची खातरजमा करावी. बोगस दुकानदारांवर फौजदारी गुन्हे दाखल करून परवाने कायमचे रद्द करावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थांनी केली आहे. आदिवासी भागातील लोकांच्या जीवाशी खेळ सुरू आहे. आयुक्त मुंढे यांच्यासारखी धडक कारवाई कनाशी अभोना भागातही झाली पाहिजे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# स्पर्धा परीक्षा व व्यक्तिमत्त्व विकास मार्गदर्शन शिबिराचे आयोजन!

### एमपीएससी व यूपीएससी उत्तीर्ण अधिकाऱ्यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन; प्रत्येक सहभागीला प्रमाणपत्र!

भोजदरी (ता. संगमनेर) : (स. गांवकरी)




ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, करिअर नियोजन आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रेरणा मिळावी या उद्देशाने भोजदरी येथे २६ जून २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिक्षणप्रेमी कै. नामदेव शंकर हांडे आणि प्रगतिशील शेतकरी कै. कुशाभाऊ शंकर हांडे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे.

भोजादेवी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा मुंबई महानगरपालिकेचे माजी अभियंता श्री. सुधाकर नामदेव हांडे यांच्या संकल्पनेतून या मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन उच्च पदांवर पोहोचलेल्या अधिकाऱ्यांचे अनुभव विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ऐकण्याची संधी या निमित्ताने उपलब्ध होणार आहे. या शिबिरात नुकतेच एमपीएससी २०२६ परीक्षा उत्तीर्ण होऊन उपविभागीय पोलिस अधिकारी (डीवायएसपी) पदासाठी निवड झालेले श्री. गणेश तमनर तसेच यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण होऊन भारतीय राजस्व सेवा (आयआरएस) मध्ये कार्यरत असलेले आणि सध्या मुंबई येथे अप्पर आयकर आयुक्त म्हणून जबाबदारी सांभाळणारे श्री. बाळासाहेब नागते हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. स्पर्धा परीक्षेची तयारी, अभ्यासाचे नियोजन, यशाचे मंत्र, वेळेचे व्यवस्थापन, व्यक्तिमत्त्व विकास आणि शासकीय सेवांमधील संधी याविषयी ते विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हे मार्गदर्शन विशेष लाभदायक ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. शिबिरास उपस्थित राहणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला भोजादेवी माध्यमिक विद्यालयाच्या वतीने सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तसेच सर्व शिबिरार्थ्यांसाठी अल्पोपहार व भोजनाची मोफत व्यवस्था करण्यात आली आहे.

या उपक्रमाचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा तसेच पालकांनी आपल्या पाल्यांसह उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी नोंदणी फॉर्म भरून संबंधित व्हॉट्सॲप समूहात सहभागी व्हावे, असेही कळविण्यात आले आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांविषयी योग्य दिशा देणारा आणि यशस्वी अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

# नर्सिंग सेवेला हिमालया बेबीकेअरचा सलाम

नवी दिल्ली : (स. गांवकरी)



■ १५ राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कार विजेत्या आणि ५० हजार नर्सेसचा सन्मान

देशाच्या आरोग्य व्यवस्थेचा भक्कम आधारस्तंभ मानल्या जाणाऱ्या नर्सेसच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी हिमालया बेबीकेअरने एक विशेष राष्ट्रीय उपक्रम राबविला आहे. या उपक्रमांतर्गत राष्ट्रपती भवनात सन्मानित झालेल्या राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कार २०२६ च्या १५ विजेत्या नर्सेसचा गौरव करण्यात आला. तसेच देशभरातील जवळपास ५० हजार नर्सेसचा सन्मान करून त्यांच्या निःस्वार्थ सेवेला मानवंदना देण्यात आली. भारताच्या सर्वाधिक विश्वासार्ह बेबीकेअर ब्रँडपैकी एक असलेल्या हिमालया बेबीकेअरला 'ट्रेन्ड नर्सेस असोसिएशन ऑफ इंडिया' कडून राष्ट्रपती भवनात आयोजित राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कार सोहळ्यात सहभागी होण्यासाठी विशेष निमंत्रण देण्यात आले होते. या प्रतिष्ठित पुरस्कारांचे वितरण भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी हिमालया बेबीकेअरने पुरस्कारप्राप्त नर्सेसचा विशेष सत्कार करून त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेतली. रुग्णसेवा, मातृत्व काळजी आणि नवजात बालकांच्या आरोग्य संवर्धनात नर्सेसची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

# संजय दिना पाटील यांच्या वक्तव्याचा पत्रकार संघाकडून तीव्र निषेध!

मुंबई : (स. गांवकरी)

■ पत्रकारांची जाहीर माफी मागावी
■ अन्यथा राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा डॉ. विश्वासराव आरोटे यांचा इशारा!
■ मुख्यमंत्री महोदयांकडे कठोर कारवाईची मागणी!




पत्रकारांना धमकावणे, शिवीगाळ करणे किंवा त्यांच्याविरोधात आक्षेपार्ह भाषा वापरणे हे लोकशाहीच्या मूल्यांना बाधा पोहोचवणारे असून अशा प्रकारच्या कथित वक्तव्याचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला आहे. खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांविषयी केलेल्या कथित वक्तव्यामुळे राज्यातील पत्रकारांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली असून त्यांनी पत्रकारांची जाहीर माफी मागावी, अन्यथा महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखले जातात. समाजातील विविध प्रश्न, जनतेच्या समस्या, लोकप्रतिनिधींचे कार्य तसेच शासनाच्या धोरणांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पत्रकार सातत्याने करत असतात. निर्भीड पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील सत्य परिस्थिती जनतेसमोर मांडण्याचे आणि सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्याचे काम पत्रकारांकडून केले जाते.

संघटनेने म्हटले आहे की, पत्रकारांनी अनेक राजकीय नेते आणि लोकप्रतिनिधींच्या कार्याला प्रसिद्धी देऊन त्यांना जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम केले आहे. अनेकांना समाजात ओळख निर्माण करून देण्यात माध्यमांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. मात्र त्याच पत्रकारांबद्दल अपमानास्पद भाषा वापरणे आणि धमकी देण्याचा प्रयत्न करणे हे अत्यंत दुर्दैवी व निषेधार्ह आहे. पत्रकारितेचे कार्य करताना कोणत्याही विषयाची दोन्ही बाजू समाजासमोर मांडणे ही पत्रकारांची जबाबदारी असते. इलेक्ट्रॉनिक मीडिया, प्रिंट मीडिया तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून पत्रकार सत्य परिस्थिती लोकांपर्यंत पोहोचवत असतात. त्यामुळे एखादी बातमी अथवा घडामोड प्रसिद्ध झाल्याने पत्रकारांवर आरोप करणे योग्य नसल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

पत्रकारांना धमकावण्याचा किंवा मारहाणीची भाषा करण्याचा प्रयत्न होत असेल तर पत्रकार समाजही गप्प बसणार नाही. पत्रकारांनी नेहमीच लोकशाही मूल्यांचे संरक्षण करण्यासाठी संघर्ष केला असून प्रसंगी रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची तयारी देखील ठेवली आहे. पत्रकारांवर दबाव टाकण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही, असे संघटनेने ठामपणे नमूद केले आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांबाबत केलेल्या कथित वक्तव्याबद्दल तात्काळ खुलासा करावा आणि पत्रकारांची जाहीर माफी मागावी, अशी मागणी केली आहे.

अन्यथा राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये निषेध आंदोलने, निवेदने आणि पत्रकारांच्या एकजुटीचे विविध कार्यक्रम राबविण्यात येतील, असा इशारा संघटनेने दिला आहे.

लोकशाहीमध्ये पत्रकारितेचे स्वातंत्र्य अबाधित राहणे आवश्यक असून पत्रकारांना धमकावण्याच्या कोणत्याही प्रकाराला पत्रकार संघटना कडाडून विरोध करेल. पत्रकारांच्या सन्मानासाठी आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ कायम लढा देत राहील, असेही निवेदनात म्हटले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### महालक्ष्मी मंदिरास NKT ट्रस्ट व गांवकरी समूहाकडून सतरंजी व घड्याळ भेट

अकोले (स. गांवकरी) : अकोले तालुक्यातील भाविक भक्तांचे आराध्य दैवत असलेल्या महालक्ष्मी मंदिरास NKT ट्रस्ट व दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने सतरंजी व भिंतीवरील घड्याळ भेट देण्यात आले. मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सुविधेचा विचार करून हा उपक्रम राबविण्यात आला. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे आणि प्रगतशील शेतकरी शिवाजीराव नाईकवाडी (मामा) यांच्या हस्ते मंदिर व्यवस्थापनाकडे साहित्य सुपूर्द करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी धार्मिक स्थळांच्या विकासासाठी सामाजिक संस्थांनी पुढाकार घेण्याची गरज व्यक्त केली. महालक्ष्मी मंदिर हे अकोले तालुक्यातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असून येथे वर्षभर दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येत असतात. भाविकांना बसण्यासाठी सतरंजी तसेच वेळेचे नियोजन करण्यासाठी घड्याळ उपलब्ध झाल्याने मंदिर परिसरातील सुविधा अधिक बळकट होणार आहेत. मंदिर प्रशासनाने NKT ट्रस्ट व दैनिक समर्थ गांवकरी समूहाचे आभार मानत सामाजिक बांधिलकीतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले. उपस्थितांनी अशा समाजोपयोगी कार्यांमुळे धार्मिक व सामाजिक क्षेत्रातील संबंध अधिक दृढ होत असल्याची भावना व्यक्त केली.

### निससचे चार हजार कोटी रुपयांचे बहुविध गुंतवणूक व्यासपीठ

NiFCO
NISUS FINANCE

मुंबई (स. गांवकरी) : भारतातील स्थावर मालमत्ता क्षेत्रातील वाढत्या संधी लक्षात घेऊन निसस फायनान्सने चार हजार कोटी रुपयांचे बहुविध गुंतवणूक व्यासपीठ उभारण्याची घोषणा केली आहे. उत्पन्न देणाऱ्या आणि मूल्यवृद्धीची क्षमता असलेल्या स्थावर मालमत्तांमध्ये गुंतवणूक करण्यावर या व्यासपीठाचा भर असणार आहे. देशांतर्गत उद्योजक, संयुक्त अरब अमिरातीतील संस्थात्मक गुंतवणूकदार, कौटुंबिक गुंतवणूक संस्था तसेच उच्च संपत्तीधारकांना एकाच व्यासपीठावर आणण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे. या व्यासपीठामध्ये विविध प्रकारच्या गुंतवणूक योजना आणि सहगुंतवणुकीची सुविधा उपलब्ध राहणार असून, 'निसस यिल्ड अँड ॲसेट मल्टिप्लायर फंड'चाही त्यात समावेश असेल. भूखंड विकास, जमिनीचे एकत्रीकरण, पुनर्विकास प्रकल्प तसेच विशेष प्रकारच्या स्थावर मालमत्ता व्यवहारांमध्ये या निधीची गुंतवणूक केली जाणार आहे. कंपनीला पुढील १८ ते २४ महिन्यांत पहिल्या टप्प्यातील निधी उभारणी पूर्ण करण्याची अपेक्षा असून, सप्टेंबर-ऑक्टोबर २०२६ पर्यंत पहिला टप्पा पूर्ण होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. एकूण निधीपैकी सुमारे ३० ते ४० टक्के गुंतवणूक संयुक्त अरब अमिरातीतील गुंतवणूकदारांकडून येण्याची शक्यता आहे. भारतात सुमारे २,५०० कोटी रुपयांचा निधी उभारण्याबरोबरच गिफ्ट सिटीमधूनही मोठ्या प्रमाणात भांडवल उभारण्याचे नियोजन आहे.

### एसअँडपी ग्लोबलकडून भारती एअरटेलच्या पतमानांकनात वाढ

नवी दिल्ली (स. गांवकरी) : भारतातील आघाडीची दूरसंचार सेवा देणारी भारती एअरटेल लिमिटेड कंपनीला जागतिक पतमानांकन संस्था एसअँडपी ग्लोबल रेटिंग्सकडून मोठा दिलासा मिळाला आहे. संस्थेने कंपनीचे दीर्घकालीन पतमानांकन 'बीबीबी'वरून 'बीबीबी+' असे वाढवले असून कंपनीबाबतचा स्थिर दृष्टिकोन कायम ठेवला आहे. हे सुधारित मानांकन २४ जून २०२६ पासून लागू करण्यात आले आहे. याचबरोबर कंपनीच्या हमीविरहित वरिष्ठ कर्जावरील पतमानांकनातही समान वाढ करण्यात आली आहे. कंपनीची सातत्याने वाढणारी उलाढाल, मजबूत रोख प्रवाह, शिस्तबद्ध आर्थिक व्यवस्थापन तसेच भारत आणि आफ्रिकेतील व्यवसायाची भक्कम कामगिरी यामुळे हे मानांकन वाढविण्यात आल्याचे संस्थेने नमूद केले आहे. त्यामुळे भारती एअरटेलची दीर्घकालीन वाढ आणि आर्थिक स्थैर्य अधिक मजबूत झाल्याचे स्पष्ट झाले आहे. एसअँडपी ग्लोबलच्या अंदाजानुसार पुढील काही वर्षांत कंपनीच्या ग्राहकसंख्येत दरवर्षी तीन ते चार टक्के वाढ होईल. तसेच प्रत्येक ग्राहकामागील सरासरी महसुलात पाच ते सात टक्क्यांची वाढ अपेक्षित आहे. ग्राहकांची वाढती खर्च क्षमता आणि उच्च दर्जाच्या सेवांचा वाढता वापर यामुळे महसुलात सातत्याने वाढ होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

### ब्रिटिश कौन्सिलतर्फे विद्यार्थ्यांसाठी १६ जुलै रोजी मार्गदर्शन सत्र




नवी दिल्ली (स. गांवकरी) : ब्रिटिश कौन्सिलने ब्रिटनमध्ये उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांसाठी १६ जुलै २०२६ रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ५ या वेळेत ऑनलाईन पूर्वप्रवास मार्गदर्शन सत्राचे आयोजन केले आहे. ब्रिटनमधील विद्यापीठांकडून २०२६ च्या शैक्षणिक सत्रासाठी तात्पुरते किंवा अंतिम प्रवेशपत्र मिळालेल्या विद्यार्थ्यांनी या सत्रात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या मार्गदर्शन सत्रामध्ये विद्यार्थ्यांना ब्रिटनमधील शिक्षण, तेथील दैनंदिन जीवन, निवास व्यवस्था, प्रवासाची तयारी, आरोग्य सेवा, सुरक्षितता, मानसिक आरोग्य, आर्थिक नियोजन आणि विद्यार्थी जीवनाशी सहज जुळवून घेण्यासाठी आवश्यक माहिती दिली जाणार आहे. तसेच विद्यार्थी प्रवेश परवानगी प्रक्रियेसंदर्भात अद्ययावत मार्गदर्शनही उपलब्ध करून दिले जाईल. या सत्रात ब्रिटनच्या विद्यार्थी प्रवेश परवानगी विभागाचे प्रतिनिधी, विद्यापीठांशी समन्वय साधणाऱ्या संस्थांचे अधिकारी, ब्रिटनमधील माजी विद्यार्थी तसेच सध्या शिक्षण घेत असलेले भारतीय विद्यार्थी सहभागी होणार आहेत. विद्यार्थ्यांना त्यांच्याशी थेट संवाद साधून विविध प्रश्नांची उत्तरे मिळण्याची संधीही उपलब्ध होणार आहे. प्रवासाचे नियोजन, आवश्यक कागदपत्रे, सोबत नेण्याच्या वस्तू, खर्चाचे नियोजन, आरोग्य सुविधा, विमा संरक्षण, सुरक्षिततेचे नियम आणि ब्रिटनमधील शिक्षण पद्धती यांसह अनेक महत्त्वाच्या विषयांवर या सत्रात सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच माजी विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष अनुभव आणि यशस्वी विद्यार्थी जीवनासाठी उपयुक्त सूचना देखील दिल्या जाणार आहेत. या मार्गदर्शन सत्रात सहभागी होण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी स्टडी यूके संकेतस्थळावर जाऊन नोंदणी करावी. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना सत्रात सहभागी होण्यासाठी आवश्यक माहिती आणि पुढील सूचना उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

# नियमाचे पालन करून ग्राहकांना सेवा, सुविधा दया, ग्राहक पंचायत

अकोले : (स. गांवकरी)



अकोले आदिवासी तालुक्यात एसटी बस प्रवासासाठी सध्या महिला, ज्येष्ठ नागरीक आणि 'अमृत' ज्येष्ठ नागरिक यांची नविन कार्ड नोंदणी व कार्ड वितरण प्रक्रिया सुरू असून यामध्ये 'पारदर्शक' पणा आण्यासाठी शासनाने ठरून दिलेले नियम व कंपनीच्या नियमानुसार अकोले तालुक्यात याची व्याप्ती वाढविण्यात बाबतचे निवेदन अकोले तालुक्याचे नायब तहसिलदार किसन लोहरे यांना दिल्याची माहिती ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलीक, कार्याध्यक्ष महेश नवले, तालुका अध्यक्ष दत्ता शेनकर यांनी दिली.

निवेदनात म्हटले आहे की एस टी बसचे नविन सवलत कार्ड काढण्यासाठी दररोज तालुक्यातील नागरीक तासन तास रांगेत सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत उभे राहून ही नंबर लागत नाही मानसिक, अर्थिक, त्रासा सह इत्यादी हाणी होत आहे.

अकोले आदिवासी तालुक्याचे बसस्थानक ते तालुक्यातील बऱ्याच गावाचे अंतर हे ४०/६०/८० किलो मिटर्स असे आहे. एवढ्या मोठ्या तालुक्यात १ एकच सुविधाकेंद्र बस स्थानक येथे चालु असून येथे दररोज मोठी गर्दी होत आहे. एस टी महामंडळाने प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या सवलती अधिक सुसंगत 'पारदर्शक' आणि डिजिटल पध्दतीने देण्यासाठी नविन एनसीएमपी कार्ड, कार्य प्रणाली लागु करण्याचा निर्णय घेतला आहे व चालू आहे. एसटी महामंडळाने नविन कार्ड काढून देण्याची व वितरणाची जबाबदारी ई-बेक्स या कंपनीला दिली आहे. शासनाने ठरून दिलेल्या व ई-बेक्स कंपनीच्या नियमानुसार पाच किलो मिटर्स अंतरामध्ये एका एजंटाने (एजंशीने) कार्ड काढुन देणे हे बंधनकारक आहे. अकोले आदिवासी तालक्यात ई-बेक्स कंपनीच्या नियमाचे पालन करून ग्रामीण भागात कोतूळ, ब्राम्हणवाडा, बेलापूर, समशेरपुर, गणोरे, राजुर, शेंडी (भंडारदरा) मवेशी, कळस, या गावात एसटीचे नविन सवलत कार्ड काढण्यासाठी रोज सेवा उपलब्ध करून देण्यात यावी. आजुन काही एजंट, एजन्सी यांची अकोले तालुक्यात नेमणुक करण्यात यावी व गावागावात कँप घेऊन नविन कार्ड काढण्याची सेवा देण्यात यावी. तसेच नविन कार्ड १९९ रुपये तर या पूर्वीचे स्मार्ट कार्ड असलेल्या प्रवाशांसाठी १४९ रुपये असा दर निश्चित आहे अनेक पर्याय सांगून जास्त आकारणी पैसे घेऊ नये. स्मार्ट कार्ड काढण्याची दर रोजची वेळ सकाळी ८ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत आसावी असे बोर्ड लावण्यात बंधनकारक असावे एसटीचे नविन सवलत कार्ड काढण्यासाठी ४ ते ६ सहा महिन्याची मुदत वाढ देण्यात यावी असे निवेदनात म्हटले आहे.

निवेदनावर ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलीक, कार्याध्यक्ष महेश नवले, तालुका अध्यक्ष दत्ता शेनकर, भाऊसाहेब आभाळे, बबनराव तिकांडे, दत्ता ताजणे, रामदास पांडे, नवनाथ आवारी, सखाहारी पांडे, माधवराव तिटमे, प्रा.डॉ. सुनिल शिंदे, गंगाराम धिंदळे अनंत घाणे, सुरेश गबाले, पाडूरंग खाडे, अशोक उघडे, राम रुद्रे, राजेंद्र घायवट, भाऊसाहेब वाकचौरे, पाडूरंग पथवे, कॉम्रेड तुळसिराम कातोरे, मोहन मुंढे, प्रकाश कोरडे, भाऊसाहेब वाळुंज, ज्ञानेश्वर पुंडे, रामदास पवार, रामहारी तिकांडे, भाऊसाहेब गोर्डे, आदिंच्या सहया आहे. निवेदनाच्या प्रती, परिवहन मंत्री ना.श्री प्रताप सरनाईक, नगर विकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकिय शिक्षण राज्यमंत्री ना.माधुरी मिसाळ, परिवहन आयुक्त महाराष्ट्र, व्यवस्थापकिय संचालक परिवहन महामंडळ महाराष्ट्र वाहतुक भवन, विभागीय नियंत्रक, एस टी महामंडळ अहिल्यानगर, आगार व्यवस्थापक एसटी महामंडळ अकोले यांना पाठवण्यात आल्या आहे.

## हिल्टनने 'स्पार्क बाय हिल्टन' हॉटेल्स सुरू करण्याची केली घोषणा

पुणे : (स. गांवकरी)

हिल्टनने आज बेंगळुरू आणि गोवा येथे 'स्पार्क बाय हिल्टन' हॉटेल्स सुरू करण्याची घोषणा केली असून, या ब्रँडचे आशिया पॅसिफिकमध्ये आगमन झाले आहे. हे उद्घाटन हिल्टनच्या ऑलिव्ह हॉस्पिटॅलिटीसोबत देशभरात १५० 'स्पार्क बाय हिल्टन' हॉटेल्स सुरू करण्याच्या धोरणात्मक करारावर आधारित आहे. भारतातील लॉंचिंगसाठी, 'स्पार्क बाय हिल्टन' स्थानिक प्रवाशांच्या गरजा आणि अपेक्षा लक्षात घेऊन काळजीपूर्वक तयार करण्यात आले आहे. आराम, सोय आणि उत्कृष्ट अतिथी अनुभवांवर लक्ष केंद्रित ठेवत हा ब्रँड भारतीय बाजारपेठेसाठी स्वतःला कसे अनुकूल करू शकतो, हे यातून दिसून येते. मोफत नाश्त्याव्यतिरिक्त ज्यामध्ये खास 'डीआयवाय' डोसा स्टेशन्स असतील , नवीन 'स्पार्क बाय हिल्टन' हॉटेल्स प्रादेशिक सेवेचे पैलू सादर करतील, जसे की सेल्फ-सर्व्ह




चाय- कार्ट , निवडक ठिकाणी जिम आणि इन-रूम डायनिंग यांसारख्या सुविधा, तसेच चार्जर, बॅटरी आणि स्नॅक्स यांसारख्या अत्यावश्यक वस्तू पुरवणारी वेंडिंग मशीन्स उपलब्ध असतील. यातील प्रत्येक सुविधा मुक्कामादरम्यान येणाऱ्या अडचणी कमी करण्यासाठी आणि प्रवाशांचा प्रवास अधिक सुकर करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. डिजिटल चेक-इन, डिजिटल की , सर्व्हिस रिक्वेस्ट सपोर्ट आणि हिल्टन ऑनर्स अँप इंटिग्रेशन यांसारखी तंत्रज्ञान-सक्षम वैशिष्ट्ये पाहुण्यांना अधिक सुलभ अनुभव देण्यासाठी तयार केली गेली आहेत.

## हर्षदुहिता कलेक्टिव्ह : भारतीय संगीत परंपरेला नव्या युगाचा स्वर

पुणे : (स. गांवकरी)

भारतीय शास्त्रीय संगीताची समृद्ध परंपरा आणि आधुनिक संगीत अभिव्यक्ती यांचा सुरेल संगम घडवत हर्षदुहिता कलेक्टिव्ह आज देशभरातील संगीतप्रेमींच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. भजन, सुफी संगीत, लोकधुना, गझल आणि आधुनिक संगीत रचना यांचे अनोखे मिश्रण सादर करणाऱ्या या समूहाने भारतीय संगीतविश्वात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. रामपूर आणि जयपूर घराण्यांच्या समृद्ध वारशातून प्रेरणा घेतलेल्या हर्षदुहिता कलेक्टिव्हचा संगीतप्रवास केवळ मनोरंजनापुरता मर्यादित नसून तो संस्कृती, परंपरा आणि आत्म-अभिव्यक्तीचा प्रवास आहे. भारतीय शास्त्रीय संगीताच्या भक्कम पायावर उभा असलेला हा समूह आधुनिक काळातील श्रोत्यांशी संवाद साधत परंपरा आणि समकालीनतेत एक सुंदर पूल उभारतो. विशेष म्हणजे, आज ज्या फ्यूजन शैलीसाठी हर्षदुहिता कलेक्टिव्ह प्रसिद्ध आहे, ती




कोणतीही आखणी करून तयार झालेली नाही. "वेगवेगळ्या शैली मिसळून फ्यूजन तयार करण्याचा आमचा कधीच हेतू नव्हता. आमच्या अनुभवांचा, परंपरांचा आणि संगीतप्रवासाचा तो नैसर्गिक परिणाम आहे," असे समूहाचे सदस्य सांगतात. त्यांच्या सादरीकरणात पारंपरिक भजनांची भक्ती, सुफी संगीताची आध्यात्मिकता, लोकसंगीताची मातीशी नाळ आणि आधुनिक संगीताची ताजगी यांचा सुंदर मिलाफ अनुभवायला मिळतो. त्यामुळे त्यांचे प्रत्येक सादरीकरण हे श्रोत्यांसाठी एक भावनिक आणि संस्मरणीय अनुभव ठरते.

हर्षदुहिता कलेक्टिव्हच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे लोकप्रिय दूरचित्रवाणी कार्यक्रम *'इंडियाज गॉट टॅलेंट'*मध्ये उपांत्य फेरीपर्यंत मजल मारणे. या व्यासपीठामुळे त्यांना राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली आणि त्यांचे संगीत देशभरातील लाखो श्रोत्यांपर्यंत पोहोचले.

समूहाला त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मश्री महेंद्र कपूर पुरस्कारासारख्या प्रतिष्ठित सन्मानांनी गौरविण्यात आले आहे. मात्र, त्यांच्या मते सर्वात मोठा पुरस्कार म्हणजे श्रोत्यांच्या मनात निर्माण होणारे भावनिक नाते.

"जेव्हा एखादा श्रोता सांगतो की आमच्या संगीतामुळे त्याला दिलासा मिळाला, घराची आठवण झाली किंवा एखादी सुंदर आठवण पुन्हा जागी झाली, तेव्हा तोच आमच्यासाठी सर्वात मोठा सन्मान असतो," असे ते सांगतात.

हर्षदुहिता कलेक्टिव्हचा ठाम विश्वास आहे की परंपरा केवळ जपण्याची गोष्ट नसून ती अनुभवली, जगली आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचवली पाहिजे. याच ध्येयाने प्रेरित होऊन हा समूह भारतीय संगीत वारशाला आधुनिक काळातील नवा आवाज देत आहे. वाढता श्रोता वर्ग, राष्ट्रीय स्तरावरील लोकप्रियता आणि कलात्मक प्रामाणिकतेची जपणूक यामुळे हर्षदुहिता कलेक्टिव्ह भारतीय संगीत क्षेत्रातील एक प्रेरणादायी नाव ठरत आहे. वेगाने बदलणाऱ्या जगातही परंपरेचा आत्मा जपत वर्तमानाशी संवाद साधणारे त्यांचे संगीत आजच्या पिढीसाठी आशेचा आणि संस्कृतीशी जोडणारा सुरेल धागा ठरत आहे.

भारतीय संगीताचा वारसा जपत नव्या पिढीशी नाते जोडणारा हर्षदुहिता कलेक्टिव्ह आज संगीतविश्वात नव्या युगाचा स्वर बनला आहे.

## विरोधी मतदारसंघांना विकासनिधी नसेल तर सविनय कायदेभंगाचा इशारा; कॉँग्रेसची टीका

पुणे : (स. गांवकरी)

विरोधी पक्षांच्या खासदारांच्या मतदारसंघांना विकासनिधी दिला जात नसल्याचे आरोप समोर येत असतील, तर तो लोकशाहीच्या तत्त्वांना बाधा देणारा प्रकार असून याविरोधात आवश्यक असल्यास सविनय कायदेभंग व असहकार आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी दिला आहे.




प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात तिवारी यांनी म्हटले आहे की, महाविकास आघाडीच्या धोरणांवर विश्वास ठेवून जनतेने निवडून दिलेल्या खासदारांनी नंतर भाजप किंवा महायुतीत प्रवेश करण्यासाठी "विकासनिधी मिळत नसल्यामुळे कामे होत नाहीत" असे कारण पुढे करणे हे केंद्रातील सत्ताधाऱ्यांच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. अशा प्रकारे विरोधी पक्षांच्या मतदारसंघांवर विकासनिधीच्या माध्यमातून दबाव आणणे ही लोकशाहीला न शोभणारी बाब असल्याची टीका त्यांनी केली.

"सबका साथ, सबका विश्वास" अशी घोषणा करणारे सरकार प्रत्यक्षात विरोधी मतदारसंघांशी सापत्नभावाची वागणूक देत असल्याचा आरोप त्यांनी केला. जनतेने मतदानातून विरोधी पक्षांच्या उमेदवारांना निवडून देताना सत्तेवर अंकुश ठेवणे, भ्रष्टाचार उघड करणे आणि लोकहिताचे प्रश्न मांडणे, ही जबाबदारी त्यांच्यावर सोपवलेली असते. त्यामुळे त्या मतदारसंघांतील विकासकामांना अडथळा आणणे म्हणजे तेथील जनतेलाच शिक्षा देण्यासारखे असल्याचे तिवारी म्हणाले. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेने इंडिया आघाडीला अधिक जागांवर विजय मिळवून देत भाजप-एनडीएविरोधात स्पष्ट कौल दिला होता. अशा परिस्थितीत विरोधी पक्षांच्या मतदारसंघांना विकासनिधी नाकारणे हे केवळ राजकीय सूडाचेच नव्हे, तर देशाला सर्वाधिक महसूल आणि जीएसटी देणाऱ्या महाराष्ट्रावरील अन्याय असल्याची टीकाही त्यांनी केली. महाराष्ट्रातील जनतेला विकासनिधीपासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न सुरू राहिला, तर काँग्रेस आणि महाविकास आघाडी त्याविरोधात तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन उभारेल. प्रसंगी सविनय कायदेभंग आणि असहकार आंदोलनाचाही पर्याय स्वीकारला जाईल, असा इशाराही गोपाळदादा तिवारी यांनी दिला.

## नव्या मालिकेतील दोन दूरध्वनी संचांच्या विक्रीला प्रारंभ

मुंबई : (स. गांवकरी)

कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित दूरध्वनी संच निर्मिती करणाऱ्या 'एआय प्लस' कंपनीने आपल्या नव्या 'नोव्हा २' मालिकेतील नोव्हा २ प्रो आणि नोव्हा २ निओ या दोन दूरध्वनी संचांच्या विक्रीला शुक्रवार (२६ जून)पासून प्रारंभ केला आहे. प्रथमच दूरध्वनी संच वापरणाऱ्या ग्राहकांपासून ते अधिक क्षमतेचा अनुभव घेऊ इच्छिणाऱ्या वापरकर्त्यांपर्यंत सर्वांच्या गरजा लक्षात घेऊन हे संच तयार करण्यात आले आहेत. हे दोन्ही संच शुक्रवारपासून दुपारी बारा वाजल्यापासून 'फ्लिपकार्ट' आणि निवडक विक्री केंद्रांवर उपलब्ध झाले आहेत. 'नोव्हा' मालिकेला ग्राहकांकडून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर कंपनीने या दोन नव्या संचांची भर घातली आहे. विक्रीच्या पहिल्या दिवशी नोव्हा २ निओच्या ४ जीबी स्मरणक्षमता व १२८ जीबी संचयन क्षमतेच्या प्रकाराची किंमत १२ हजार ९९९ रुपये, तर ६ जीबी स्मरणक्षमता व १२८ जीबी संचयन क्षमतेच्या प्रकाराची किंमत १३ हजार ९९९ रुपये ठेवण्यात आली आहे. नोव्हा २ प्रोच्या ६ जीबी स्मरणक्षमता व १२८ जीबी संचयन क्षमतेच्या प्रकाराची सुरुवातीची किंमत १४ हजार ९९९ रुपये, तर ८ जीबी स्मरणक्षमता व १२८ जीबी संचयन क्षमतेच्या प्रकाराची किंमत १६ हजार ९९९ रुपये आहे. सर्व बँकांच्या धनादेश व पतपत्रांवर एक हजार रुपयांची सवलतही देण्यात आली आहे.




## कॅन्सरवर मात करणाऱ्या 'विजेत्यां'च्या जिद्दीचा विशेष सन्मान

पुणे : (स. गांवकरी)

धैर्य, जिद्द आणि आशा या मुल्यांवर आधारित, एम ओ सी कॅन्सर केयर पुणे यांनी आयोजित केलेल्या 'विजेता – स्ट्रॉन्ग माइंड्स अगेन्स्ट कॅन्सर या विशेष उपक्रमात कॅन्सरवर मात केलेल्या किंवा तशी जिद्द उराशी बाळगणाऱ्या २०० हून अधिक विजेत्यांचा गौरव करण्यात आला. कॅन्सरच्या आव्हानात्मक प्रवासात खंबीरपणे उभे राहून आयुष्याचा प्रवास न थांबवणाऱ्या व्यक्तींना समर्पित हा कार्यक्रम होता.




पुण्यात आयोजित करण्यात आलेला 'विजेता' हा कार्यक्रम कॅन्सरवर मात करण्यासाठी मानसिक बळ किती महत्त्वाचे असते याचा प्रभावी संदेश देणारं प्रतीक ठरला. कॅन्सरमुक्त झालेले रुग्ण, कॅन्सरला दीर्घकालीन आजाराप्रमाणे स्वीकारून आपल्या आयुष्याची उद्दिष्टे पूर्ण करणारे व्यक्ती, तसेच सध्या उपचार घेत असूनही सकारात्मक दृष्टिकोनाने लढा देणारे रुग्ण – प्रत्येकाची कहाणी प्रतिकूल परिस्थितीतही उभारी घेण्याची प्रेरणा देणारी होती. या कार्यक्रमात सहभागी झालेल्या कॅन्सर विजेत्यांनी आपल्या संघर्ष, चिकाटी आणि आशेचे खास प्रवास एकमेकांशी मनमोकळेपणाने शेअर केले. त्यांच्या अनुभवांमधून कॅन्सरशी सामना करताना येणाऱ्या मानसिक व शारीरिक आव्हानांची जाणीव झाली, तसेच कुटुंब, मित्रपरिवार आणि समाजाच्या पाठिंब्याचे महत्त्व अधोरेखित झाले.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या प्रसिद्ध मराठी अभिनेत्री *श्रुती मराठे* यांनी कॅन्सर विजेत्यांच्या प्रबळ इच्छाशक्तीचे कौतुक करत त्यांच्या प्रेरणादायी प्रवासातून इतरांना बळ मिळत राहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. सुप्रसिद्ध साहित्यिक *कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर)* यांच्या नात *पियू आरोळे-शिरवाडकर* यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

यावेळी बोलताना एम ओ सी कॅन्सर केयर, पुणे येथील वरिष्ठ कर्करोगतज्ज्ञ *डॉ. मंगेश मेखा* म्हणाले, "कॅन्सर हा एखाद्या व्यक्तीच्या आयुष्याचा एखादा अध्याय असू शकतो मात्र; संपूर्ण आयुष्य नव्हे. 'विजेता'च्या माध्यमातून आम्हाला अशा व्यक्तींचा गौरव करायचा होता, ज्यांनी कॅन्सरशी सामना करताना असामान्य मानसिक ताकद, सकारात्मकता आणि आशा दाखवली. त्यांच्या प्रवासातून हे सिद्ध होते की, आशा आजाराच्या परिस्थितीतही आयुष्य अर्थपूर्ण, समृद्ध आणि आनंददायी जगता येते."

याचवेळी एम ओ सी कॅन्सर केयर, पुणे येथील वरिष्ठ कर्करोगतज्ज्ञ डॉ. रवी वाटेगावकर म्हणाले, "कॅन्सरविरोधातील लढ्यात एकमेकांना आधार देणाऱ्या आणि मानसिकदृष्ट्या खंबीर असणाऱ्या व्यक्तींना एकत्र आणणारी मोठी चळवळ म्हणून 'विजेता' हा उपक्रम विकसित करण्याचा आमचा मानस आहे."

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या *श्रुती मराठे* म्हणाल्या, "या सर्व प्रेरणादायी व्यक्तींना भेटण्याचा अनुभव अत्यंत भावनिक आणि नम्र करणारा आहे. खरे बळ हे संकट नसण्यात नसते, तर प्रत्येक दिवशी त्या संकटाला सामोरे जाण्याच्या धैर्यात असते. येथे उपस्थित प्रत्येक व्यक्तीची सकारात्मकता, जिद्द आणि लढाऊ वृत्ती विलक्षण प्रेरणादायी आहे. आशा आणि आत्मविश्वास किती मोठी ताकद असते, याचे हे जिवंत उदाहरण आहे."

## थोडक्यात पण महत्वाचे



### ॲमेझॉनचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेतली पंतप्रधान मोदी यांची भेट

पुणे (स. गांवकरी) : ॲमेझॉनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अँडी जॅसी यांनी आज नवी दिल्लीत माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. जॅसी यांनी ॲमेझॉनच्या भारताप्रती असलेल्या दीर्घकालीन कटिबद्धतेचा पुनरुच्चार केला आणि २०३० पर्यंत देशातील एआय आणि क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चरचा विस्तार करण्यासाठी अतिरिक्त १३ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याची घोषणा केली. यामुळे २०२६ ते २०३० दरम्यान एआय आणि क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चरचा विस्तार व समर्थनासाठी ॲमेझॉनची एकूण नियोजित गुंतवणूक २१ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त होईल, ज्यामुळे ॲमेझॉन देशातील सर्वात मोठा जागतिक एआय आणि क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चर गुंतवणूकदार म्हणून प्रस्थापित होईल. या गुंतवणुकीमुळे मुंबई आणि हैदराबादमधील एडब्ल्यूएस डेटा सेंटरची क्षमता वाढेल; ज्यामुळे स्टार्टअप्स, उद्योग आणि सरकारी संस्थांना सानुकूल एआय चिप्स, व्यवस्थापित एआय सेवा, सुरक्षित व विश्वासार्ह क्लाउड तंत्रज्ञान आणि डेव्हलपर टूल्स मिळतील, ज्यामुळे ते अधिक वेगाने नाविन्यता आणू शकतील, वेगाने विस्तार करू शकतील आणि जागतिक स्तरावर ग्राहकांना सेवा देऊ शकतील. २०१०-२०३० या कालावधीत ॲमेझॉनची भारतातील एकूण संचित गुंतवणूक ८८ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त झाली आहे. ॲमेझॉन आपल्या ई-कॉमर्स आणि क्विक कॉमर्स व्यवसायाला बळ देणाऱ्या ऑपरेशन्स नेटवर्कमध्ये गुंतवणूक सुरूच ठेवेल. कंपनीने या वर्षात २० हून अधिक नवीन फुलफिलमेंट सेंटर्स आणि १०० हून अधिक नवीन लास्ट माईल डिलिव्हरी स्टेशन्स सुरू करण्याचे नियोजन केले आहे, ज्यामुळे देशभरातील ग्राहकांना, विशेषतः टियर ३ आणि ४ शहरांमध्ये जलद आणि विश्वासार्ह डिलिव्हरी मिळेल. याद्वारे ग्राहकांना अवघ्या काही मिनिटांत, तासांत आणि दुसऱ्या दिवशी डिलिव्हरीसह सर्वात वेगवान सेवा आणि उत्पादनांची सर्वात मोठी श्रेणी उपलब्ध करून दिली जाईल.




### कॅन्सर हीलर सेंटरचे देशातील ३०वे आणि महाराष्ट्रातील ५वे केंद्र

पुणे (स. गांवकरी) : महाराष्ट्रात कॅन्सरचे वाढते प्रमाण लक्षात घेता, कॅन्सर हीलर सेंटरने पुण्यात आपल्या नवीन केंद्राचे उद्घाटन केले आहे. हे केंद्र देशातील ३०वे आणि महाराष्ट्रातील ५वे केंद्र आहे. या केंद्राच्या उद्घाटनानिमित्त पुण्यात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी संस्थेने वेळेवर सल्लामसलत, कॅन्सरच्या लवकर निदानाबाबत जनजागृती आणि महानगरांबाहेरील भागांमध्ये रुग्णकेंद्रित कॅन्सर उपचारसेवेची गरज अधोरेखित केली. ICMR-NCDIR च्या महाराष्ट्र कॅन्सर प्रोफाइलनुसार, २०२६ मध्ये राज्यात १.३० लाखांहून अधिक नवीन कॅन्सर रुग्णांची नोंद होण्याचा अंदाज आहे. यामध्ये पुरुषांमध्ये ६१,७०३ आणि महिलांमध्ये ६८,७६२ रुग्णांचा समावेश आहे. या अहवालात तंबाखूचे सेवन, दुय्यम धूम्रपानाचा संपर्क, लठ्ठपणा आणि जीवनशैलीशी संबंधित आरोग्य जोखमी हे कॅन्सरशी संबंधित प्रमुख घटक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी सहज उपलब्ध कॅन्सर मार्गदर्शन, वेळेवर निदान आणि सातत्यपूर्ण उपचार सहाय्य अधिक महत्त्वाचे ठरत आहे.

### अमली पदार्थांची तस्करी आणि व्यसनाधीनतेविरुद्ध जनजागृतीची मोहीम




पुणे (स. गांवकरी) : अमली पदार्थांची वाढती तस्करी आणि तरुणांमध्ये वाढत चाललेली व्यसनाधीनता ही चिंतेची बाब असून, याविरोधात व्यापक जनजागृती आणि प्रभावी उपाययोजना राबविण्याच्या उद्देशाने आनंदवन व्यसनमुक्ती केंद्रातर्फे 'नशामुक्त भारत अभियान' राबविण्यात येणार असल्याची माहिती केंद्राचे अध्यक्ष डॉ. अजय दुधाने यांनी पत्रकार परिषदेत दिली. २६ जून हा जागतिक अंमली पदार्थ सेवन व अवैध वाहतूक विरोधी दिन म्हणून पाळण्यात येतो. या पार्श्वभूमीवर या मोहिमेची सुरुवात शुक्रवार, २६ जून २०२६ पासून पुण्यातील मराठवाडा महाविद्यालय येथे जनजागृती आणि पोस्टर मोहिमेद्वारे करण्यात येणार आहे. पत्रकार परिषदेला प्रकल्प समन्वयक निलेश शिंदे उपस्थित होते. डॉ. अजय दुधाने म्हणाले, अमली पदार्थांचे व्यसन ही आता केवळ शहरी समस्या राहिलेली नसून त्याचा फटका पुणे शहरासह आसपासच्या परिसरातील कुटुंबांनाही बसत आहे. सहज उपलब्धता, मित्रपरिवाराचा दबाव आणि जनजागृतीचा अभाव यामुळे अधिकाधिक तरुण व्यसनाधीनतेकडे वळत आहेत. परिणामी कुटुंबे विस्कळीत होणे, शिक्षण अर्धवट सोडणे, मानसिक आरोग्याच्या समस्या निर्माण होणे आणि किरकोळ गुन्ह्यांमध्ये वाढ होणे असे दुष्परिणाम समाजासमोर उभे राहत आहेत. या अभियानांतर्गत अमली पदार्थ विक्रेते आणि तस्करांविरुद्ध कठोर कारवाई, शाळा, महाविद्यालये आणि आयटी कंपन्यांमध्ये नियमित जनजागृती सत्रे, पालकांसाठी समुपदेशन कार्यशाळा, सरकारी व्यसनमुक्ती केंद्रांचा विस्तार, प्रत्येक शहर व तालुक्यात परवडणाऱ्या आणि गोपनीय उपचार सुविधांची उपलब्धता, तसेच स्थानिक स्तरावर 'अमली पदार्थमुक्त क्षेत्र' समित्यांची स्थापना करण्याची मागणी करण्यात येणार आहे.

### व्हिक्टोरियाज सिक्रेटतर्फे पुण्यात नवीन दालनाचा शुभारंभ

पुणे (स. गांवकरी) : आधुनिकता त्याचबरोबर फॅशनच्या संकल्पनेवर आधारित अंतर्वस्त्रे, लाउंजवेअर, स्पोर्ट्स कलेक्शनची निर्मिती करणारी, उत्तम अत्तरे, बॉडी केअरसह 'व्हिक्टोरियाज सिक्रेट पिंक' कलेक्शनच्या माध्यमातून महिलांमध्ये आत्मविश्वास फुलविणारी, आनंद पसरविणारी आणि 'सेक्सी' व्यक्तिमत्व फुलविण्यासाठी प्रयत्नशील असणारी आघाडीची रिटेलर कंपनी 'व्हिक्टोरियाज सिक्रेट'ने भारतातील आपली ब्रँड ॲम्बेसेडर तृप्ती डिमरी हिचे पुण्यातील फिनिक्स एव्हेन्यू ऑफ स्टार्स या आपल्या नव्याने सुरू झालेल्या स्टोअरमध्ये भेटीच्या वेळी जोरदार स्वागत केले. भारतात महिला ग्राहकांमध्ये आपली लोकप्रियता आणखी उंचावण्यासाठी तृप्ती डिमरीची ही भेट ब्रँडसाठी अतिशय महत्त्वाचा टप्पा ठरली आहे. सांस्कृतिक भागीदारी आणि खरेदीच्या माध्यमातूम महिला ग्राहकांना भारावून टाकणाऱ्या अनुभवांतून त्यांच्याशी आपले नातेसुध्दा या भेटीमुळे अधिक दृढ केले आहे.

## सरसकट कर्जमाफीवर निर्णय घ्यावा

### अन्यथा २९ जूनला मराठवाड्यात तीव्र शेतकरी आंदोलन ; आ.रोहित पवार यांचा सरकारला इशारा

कर्जत : (स. गांवकरी)

विनाअट सरसकट शेतकरी कर्जमाफीबाबत सरकारने तातडीने निर्णय न घेतल्यास येत्या सोमवारी, २९ जून रोजी मराठवाड्यात शेतकऱ्यांचे मोठे आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा आ. रोहित पवार यांनी दिला असून सरकारने या इशाऱ्याची गांभीर्याने दखल घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. विनाअट सरसकट शेतकरी कर्जमाफीच्या मागणीसाठी आ. रोहित पवार यांनी पंढरपूरच्या पवित्र भूमीत केलेल्या अन्नत्याग आंदोलनानंतर राज्य सरकारने दिलेल्या आश्वासनाची अद्याप पूर्तता न झाल्याने त्यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची भेट घेत कर्जमाफीच्या प्रश्नावर विधानसभेत सविस्तर चर्चा घडवून आणण्याची मागणी केली आहे. पंढरपूर येथे



झालेल्या आंदोलनादरम्यान मंत्री गिरीश महाजन यांनी आ. रोहित पवार यांची भेट घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा केली होती. त्यावेळी अधिवेशनापूर्वी या विषयावर बैठक घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते. या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले; मात्र अद्यापही संबंधित बैठक आयोजित करण्यात आलेली नसल्याचे आ. रोहित पवार यांनी निदर्शनास आणून दिले.

यासंदर्भात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना दिलेल्या निवेदनात आ. पवार यांनी कर्जमाफी योजनेतील जाचक अटी हटविण्याबाबत सभागृहात व्यापक चर्चा घडवून आणण्याची विनंती केली. तसेच शासनाने दिलेल्या आश्वासनानुसार संबंधित विभागांचे मंत्री व वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत सर्वपक्षीय शिष्टमंडळाची तातडीने बैठक आयोजित करण्यासाठी शासनाला निर्देश द्यावेत, अशी मागणीही त्यांनी केली.

या प्रस्तावित बैठकीसाठी आ. रोहित पवार यांच्यासह राजू शेट्टी, अजित नवले, शशिकांत शिंदे, हर्षवर्धन सपकाळ, अंबादास दानवे, सुधीर मुनगंटीवार, बच्चू कडू, जयंत पाटील (शेकाप), रघुनाथदादा पाटील, वामनराव चटप, रविकांत तुपकर, प्रवीणदादा गायकवाड, रविराज साबळे यांच्यासह विविध राजकीय पक्ष व शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींना सहभागी करून घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

## पुण्यातील विषारी दारूकांडावरून विधान परिषदेत गदारोळ

मुंबई : (स. गांवकरी)

पुण्यातील विषारी दारूकांड प्रकरणावरून विधान परिषदेत गुरुवारी विरोधकांनी सरकारला धारेवर धरत प्रश्नांच्या फैरी झाडत यामध्ये मृत्यूमुखी पडलेल्या २२ जणांच्या वारसाला सरकारी नाहीतर निदान निमसरकारीमध्ये कंत्राटी रोजगार द्यावा, अशा मागण्या केल्या. तसेच सरकार या घटनेबाबत संवेदनशील नसल्याचा आरोप केला. तर सत्ताधारी सदस्यांनी दोषींवर कठोर पावले उचलल्याचे सांगत विरोधक या प्रकरणाला राजकीय वळण देत असल्याचा आरोप केला. भाजप आमदार अमित गोरखे यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून विषारी दारूमुळे मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्याची मागणी सरकारकडे केली. या लक्षवेधीवरील चर्चेदरम्यान शिवसेना आमदार सचिन अहिर, अंबादास दानवे, अनिल परब आदी विरोधी सदस्यांनी या दारूकांडातील काही मृत व्यक्तींचे अंत्यसंस्कार शवविच्छेदनाशिवाय झाल्याने प्रत्यक्ष मृतांचा आकडा अधिक असू शकतो, असा मुद्दा उपस्थित केला. तर या प्रकरणातील मुख्य सूत्रधार योगेश वानखेडे, राधेश्याम प्रजापती आणि इतर आरोपींवर केवळ उत्पादन शुल्क कायद्यानुसार नव्हे तर सदोष मनुष्यवधासह कठोर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. तसेच भिवंडीहून २१५ लिटर मिथेनॉल पुण्यात कसे पोहोचले, याचीही चौकशीची मागणी केली. यावर उत्तर देताना गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी सरकारने कोणालाही पाठीशी घातले नसल्याचे स्पष्ट केले. या प्रकरणात अनेक अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आल्याची माहिती दिली. तसेच सर्व आरोपींवर भारतीय न्याय संहितेअंतर्गत सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल केले असल्याचे त्यांनी सांगितले.

## भविष्योन्मुख सुशासनाचा नवा अध्याय

पुणे : (स. गांवकरी)

द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया (ICSI) यांच्या 27व्या नॅशनल कॉन्फरन्स ऑफ प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरीजचे उद्घाटन आज पुण्यात झाले. “Company Secretaries as Leaders: AI, ESG & Stewardship” या संकल्पनेवर आधारित दोन दिवसीय परिषदेत उद्योग क्षेत्रातील मान्यवर, वरिष्ठ कॉर्पोरेट व्यावसायिक आणि नियामक संस्थांचे अधिकारी सहभागी झाले आहेत. या प्रसंगी ICSI ने एक ऐतिहासिक घोषणा करत 2026 च्या निवडणुका पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येणार असल्याचे जाहीर केले. विशेष म्हणजे, कोणत्याही व्यावसायिक संस्थेकडून प्राधान्यक्रम मतदान (Preferential Voting) ऑनलाइन पद्धतीने घेण्याची ही जगातील पहिलीच वेळ असल्याचा दावा संस्थेने केला आहे. पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे अंशकालीन सदस्य प्रा. (डॉ.) गौरव वल्लभ यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील अनुपालन व्यवस्थेवर भाष्य




■ ICSI कडून ई-व्होटिंगसह अनेक महत्त्वपूर्ण उपक्रमांची घोषणा

करताना कंपनी सेक्रेटरीजना विश्वास, उत्तरदायित्व आणि सुशासनाचे प्रमुख घटक असल्याचे सांगितले. AI च्या जबाबदार वापरामुळेच भविष्यातील स्पर्धात्मक आघाडी निश्चित होईल, असे त्यांनी नमूद केले. पेटंट, डिझाईन आणि ट्रेडमार्कचे नियंत्रक जनरल प्रा. (डॉ.) उन्नत पी. पंडित यांनी कंपनी सेक्रेटरीजना ट्रेडमार्क एजंट म्हणून उपलब्ध असलेल्या संधींवर प्रकाश टाकला. बौद्धिक संपदा व्यवस्थापन आणि सुशासन कौशल्य यांची सांगड घालून कंपनी सेक्रेटरीज भारताच्या नवोन्मेष परिसंस्थेतील महत्त्वाचे भागीदार बनू शकतात, असे त्यांनी सांगितले.

## नॉलेज नेक्स्ट ‘नासा ट्रेनिंग प्रोग्राम’ निवडीसाठी सप्टेंबरमध्ये परीक्षा

पुणे : (स. गांवकरी)

अमेरिकेतील नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशनच्या (नासा) सहकार्याने हन्टस्वीले, अल्बामा येथे उभारलेल्या यूएस स्पेस अँड रॉकेट सेंटरमधील 'नासा'च्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी (नासा ट्रेनिंग प्रोग्राम) महाराष्ट्रात घेण्यात येणारी निवड चाचणी परीक्षा सप्टेंबर 2026 मध्ये होणार आहे. भारतामध्ये स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाऊंडेशनच्या वतीने घेण्यात येणार आहे.. इयत्ता 6 वी ते 12 वी च्या मुलांना ही परीक्षा देता येणार असून, या परीक्षेसाठी अर्ज करण्याची मुदत 29 जुन 2026 ते 31 ऑगस्ट 2026 असल्याची माहिती स्वान फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शशिकांत कांबळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी सचिव विकास टाकळीकर , कोषाध्यक्ष अक्षय खोब्रागडे, सहसचिव गौरव सोमवंशी,प्रसाद भोपळे, अमन पाचघरे आणि संकेत जैन आदी




उपस्थित होते. शशिकांत कांबळे म्हणाले , "स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाऊंडेशन वतीने भारतामध्ये पहिल्यांदाच 2023 ला ट्रेनिंग प्रोग्रामच्या निवडीसाठी महाराष्ट्रामध्ये इ. ६ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी परिक्षा घेण्यात आली त्या परीक्षे नंतर काही विध्यार्थींना आलाबमा सेंटर व सिंगापूर सायन्स सेंटर ला घेऊन. जाण्यात आले. यावर्षी 2 री नॉलेज नेक्स्ट परीक्षा आयोजित करण्यात आली आहे.प्रत्येक वर्गासाठी स्वतंत्र प्रश्नपत्रिका असेल. प्रामुख्याने गणित, विज्ञान, भूगोल, बुद्धिमापन यावर आधारित प्रश्नपत्रिका असेल. यामुळे विद्यार्थी चाकोरीबाहेर जाऊन विषयांचा अभ्यास करणार आहेत. शिवाय अंतराळविषयक संशोधन, प्रात्यक्षिके यांचा अभ्यास त्यांना विद्यार्थीदशेत करायला मिळणार असून, येणाऱ्या पिढीसाठी हे महत्वाचे आहे." विकास टाकळीकर म्हणाले, "ही परीक्षा महाराष्ट्रातील इंग्रजी, सेमी इंग्रजी माध्यमातील शाळांसह जिल्हा परिषद, महानगपालिका, नगरपालिका शाळांचाही समावेश आहे. या परीक्षेसाठी 29 जून पासून नावनोंदणी करता येणार आहे. 30 ऑगस्ट 2026 पर्यंत नावनोंदणी सुरु राहील. या परीक्षेतून निवड होणाऱ्या विद्यार्थ्यांचा ऑक्टोंबर सत्कार होणार आहे. जानेवारी आणि फेब्रुवारी मध्ये युएस स्पेस अँड रॉकेट सेंटर, हन्टस्वीले, अल्बामा आणि सिंगापूर सायन्स येथे विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी नेण्यात येईल. अमेरिकेतील स्पेस कॅम्प, न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, ऑरलॅन्डो या ठिकाणीही विद्यार्थ्यांना घेऊन जाण्यात येणार आहे. ." अक्षय खोब्रागडे म्हणाले, "आज पालक आपल्या मुलाने अनेक रिॲलिटी शोमध्ये सहभागी व्हावे, याकरिता अनेक प्रयत्न करताना दिसतात. परंतु ही परीक्षा अंतराळ एज्युकेशनच्या दृष्टीने खूप महत्त्वाची असेल." यावेळी फाउंडेशन चे CEO प्रसाद भोपळे म्हणाले यापरीक्षेचे पहिले पारितोषिक आलाबमा येथील स्पेस सेंटर आणि दुसरे पारितोषिक सिंगापूर सायन्स सेंटर स्टडी टूर असे असणार आहे. अधिक माहितीसाठी https://swanrsfoundation.com/swan या संकेतस्थळास भेट द्यावी किंवा +91 84848 72392 या क्रमांकावर संपर्क साधावा असे अवाहन स्वान रिसर्च फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

## ओतूरमधील चैतन्य विद्यालयात गुणवंतांचा गुणगौरव

ओतूर : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील ग्राम विकास मंडळ संचलित चैतन्य विद्यालयात मार्च २०२६ मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेत शेकडा ९० पेक्षा जास्त गुण मिळवलेल्या २८ विद्यार्थ्यांचा व स्पर्धा परीक्षेद्वारे केंद्रप्रमुख म्हणून नियुक्ती झालेल्या शिक्षकांचा गुणगौरव समारंभ ग्राम विकास मंडळाचे अध्यक्ष अनिल तांबे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाल्याची माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रतिक अकोलकर यांनी दिली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष अनिल तांबे, प्रभाकर तांबे, रघुनाथ तांबे, छबुराव तांबे, इंदूमती डुंबरे, सीमा तांबे , छबुराव थोरात,प्रतीक अकोलकर यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा मेडल देऊन व पेढा भरवून अभिनंदन करण्यात आले. स्पर्धा परीक्षेद्वारे केंद्रप्रमुख म्हणून नियुक्ती झालेल्या सुदेष्णा सर्जेराव गाढवे व मनोहर वामन तसेच दक्षिण आफ्रिकेमध्ये अल्ट्रामॅरेथॉन स्पर्धेत चांगली




कामगिरी केल्याबद्दल अमोल तांबे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी ग्राम विकास मंडळ ओतूरचे खजिनदार रघुनाथ तांबे, मनोहर वामन, सुदेष्णा गाढवे, जयश्री डुंबरे, विद्यार्थिनी अनुश्री तांबे यांनी आपल्या मनोगतात विद्यालयाबद्दल गौरव उद्गार काढले.

ग्राम विकास मंडळाचे माजी खजिनदार स्वर्गीय भिमसिंग डुंबरे गुरुजी यांचे स्मरणार्थ श्रीमती इंदुमती भीमसिंग डुंबरे यांनी एसएससी परीक्षेतील प्रथम पाच क्रमांकांना साडेपाच हजार रुपये रोख बक्षीस दिले. तसेच सौ. विमलताई सुरेश डुंबरे यांनी पहिल्या पाच विद्यार्थ्यांना प्रत्येकी १२०० रुपये किमतीची सहा हजार रुपयांची महापुरुषांच्या चरित्राचा आठ पुस्तकांचा संच सप्रेम भेट दिला. जयश्री जीवन डुंबरे यांनी संघर्ष कन्या संस्कृती सुनील बारे हिला रोख ११०० रुपयांचे पारितोषिक दिले. विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक छबुराव थोरात यांनी सर्व गुणवंत विद्यार्थी व पालक यांना पेढा देऊन सर्वांचे तोंड गोड केले. केंद्रप्रमुख सुदेष्णा सर्जेराव सर्जेराव गाढवे व प्रसिद्ध शिल्पकार यतिन शेटे यांनी डिजिटल स्कूलसाठी अनुक्रमे प्रत्येकी ५०००/- व २५००/- रुपयांची आर्थिक मदत विद्यालयास दिली. पुढील वर्षापासून विद्यालयात दहावीच्या परीक्षेत प्रथम दहा येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सिताराम डुंबरे, सीमा अनिल तांबे, नितीन गुलाबराव डुंबरे यांनी रोख बक्षीसे जाहीर करण्यात आली. या कार्यक्रम प्रसंगी ग्राम विकास मंडळ ओतूरचे उपाध्यक्ष प्रभाकर तांबे,रघुनाथ तांबे, पंकज घोलप ,प्रकाश डुंबरे, नितीन तांबे, अमोल डुंबरे, छबुराव तांबे ,सिताराम डुंबरे, अनिल उकिरडे, संजय हिरे, मेघा तांबे, भाग्यश्री , जयश्री डुंबरे ,शिल्पा पानसरे, सारिका शेटे,ललिता थोरात, कोमल बारे, वनिता उकिरडे, रेश्मा तांबे, पल्लवी दिघे, सुनिल पंडोरे ,प्रशांत तांबे, मनोहर वामन, नवनाथ बोरुडे, रवींद्र ढमाले, गोरक्ष शिंगोटे, विठ्ठल पानसरे, दीपक फापाळे, देविदास रगतवान, नितीन डुंबरे, यतीन शेटे, सचिन बारे, लक्ष्मण टिकेकर, संतोष उकिरडे, अनिल तांबे, संपत तांबे, योगेश शेटे, शिवाजी थोरात आदी पालक, शिक्षक बहुसंख्येने उपस्थित होते. गुणवंत विद्यार्थी बक्षीस वाटप नियोजन भाऊसाहेब खाडे, मिलिंद खेत्री, अमित झरेकर,ईश्वर ढमाले, प्रसन्न तांबे,अरविंद आंबरे यांनी केले. सूत्रसंचालन संतोष कांबळे व प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रतीक अकोलकर यांनी केले.

## नेक्सस वेस्टएंड मॉल’ आणि ‘द पॅव्हेलियन’तर्फे ‘एंड ऑफ सॅडनेस सेल’चे आयोजन

पुणे : (स. गांवकरी)

यंदाच्या हंगामात, ‘नेक्सस वेस्टएंड मॉल’ आणि ‘द पॅव्हेलियन, पुणे’ यांच्यातर्फे ‘एंड ऑफ सॅडनेस सेल’ सुरू करून रोजच्या आनंदाचे क्षण साजरे करण्यात येत असून, पुणेकरांना यात सहभागी होण्याचे आमंत्रण देण्यात येत आहे. लोक मॉलमध्ये फक्त खरेदी करण्यासाठीच येत नाहीत. ते मैलाचे टप्पे साजरे करण्यासाठी, मित्रांना भेटण्यासाठी, कुटुंबासोबत वेळ घालवण्यासाठी, आठवणी निर्माण करण्यासाठी, नवीन अनुभव घेण्यासाठी आणि अनेकदा फक्त आपले मन हलके करण्यासाठी किंवा प्रसन्न वाटण्यासाठी येतात. आपण सगळेच कधी ना कधी अशा परिस्थितीतून गेलो आहोत. कामातील एखादा वाईट दिवस, रद्द झालेला बेत, एखादा निराशाजनक निकाल, हुकलेली संधी किंवा फक्त असा एखादा दिवस जेव्हा काहीच आपल्या मनासारखे होत नाही. आयुष्य आपल्याला नाराज होण्याची अनेक कारणे देत असले, तरी ‘नेक्सस वेस्टएंड मॉल’ आणि ‘द पॅव्हेलियन, पुणे’ तुम्हाला यातून बाहेर पडण्याचे असंख्य मार्गदेखील देतात; मग ते मित्रांसोबतचे जेवण असो, चित्रपट असो, कुटुंबासोबत घालवलेला दर्जेदार वेळ असो. फॅशन, सौंदर्य प्रसाधने, इलेक्ट्रॉनिक्स, डायनिंग, मनोरंजन आणि लाइफस्टाइल ब्रँड्सवर उत्कृष्ट ऑफर्ससह, हा ‘एंड ऑफ सॅडनेस सेल’ ग्राहकांना आयुष्यातील छोट्या-छोट्या निराशा बाजूला सारून चेहऱ्यावर हसू आणणाऱ्या अनुभवांचा आनंद घेण्यास प्रोत्साहित करतो. २२ जूनपासून ‘नेक्सस वेस्टएंड मॉल’ आणि ‘द पॅव्हेलियन, पुणे’ येथे ग्राहक ‘शॉपर्स स्टॉप’, ‘लेव्हीज’, ‘आदिदास’ आदी आघाडीच्या ब्रँड्सवर ५० टक्क्यांपर्यंतच्या आकर्षक ऑफर्स आणि सवलतींचा लाभ घेऊ शकतात.

# दशक्रिया घाटावरील अतिक्रमणावरून संताप

### मंजूर कामाच्या जागेवरच अवैध शेड उभारणीचा आरोप

पारनेर : (स. गांवकरी)

पारनेर शहरातील दशक्रिया विधी घाट शेड बांधकाम व सुशोभीकरणासाठी ३० लाख रुपयांचा निधी मंजूर होऊन पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते नुकतेच भूमिपूजन पार पडले असताना, त्याच जागेवर काही व्यक्तींनी पूर्वग्रहदूषित व खोडसाळ हेतूने अवैधरित्या शेड उभारण्याचे काम सुरू केल्याचा आरोप होत आहे. या प्रकारामुळे शहरात संतापाची लाट उसळली असून, विकासकामांमध्ये अडथळे निर्माण करण्याचा हा जाणीवपूर्वक प्रयत्न असल्याची चर्चा



नागरिकांमध्ये सुरू आहे. विशिष्ट नागरी सेवा व सुविधा योजनेअंतर्गत वार्ड क्रमांक ५ मध्ये दशक्रिया घाट शेड व सुशोभीकरणासाठी ३० लाख रुपयांचे काम मंजूर झाले असून संबंधित कामाचे भूमिपूजनही विधिवत पार पडले आहे. मात्र त्याच ठिकाणी कोणतीही अधिकृत परवानगी नसताना शेड उभारणीचे काम सुरू करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे या प्रकाराला विरोध करणाऱ्या

"दशक्रिया घाटावर शेड उभारण्यास आमचा कोणताही विरोध नाही, मात्र शासनाकडून मंजूर झालेल्या ३० लाख रुपयांच्या विकासकामाच्या जागेवर अतिक्रमण करून काम करणे योग्य नाही. सार्वजनिक निधीतून होणाऱ्या कामात अडथळा निर्माण होणार असेल तर त्याची दखल घेणे हे लोकप्रतिनिधी म्हणून आमचे कर्तव्य आहे. आम्ही नगरपंचायत प्रशासनाकडे केवळ नियोजित जागेचे संरक्षण व्हावे आणि मंजूर काम सुरळीतपणे पूर्ण व्हावे, अशीच मागणी केली आहे. नागरिकांच्या हिताच्या विकासकामांबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून योग्य तो निर्णय घ्यावा."

**- अशोक चेडे, नगरसेवक, पारनेर नगरपंचायत.**

आमचा सबंधित शेड उभारणीला कुठल्याही प्रकारचा विरोध नसून, मंजूर विकासकामाच्या जागेवर अतिक्रमण करून ते उभारण्यास आमचा आक्षेप आहे. ज्यांना कुणाला सबंधित शेड उभारावयाचे आहे त्यांच्यासाठी आपल्याकडे दशक्रिया विधी घाटावर भरपूर जागा उपलब्ध आहे त्याठिकाणी त्यांनी ते उभारावे, आम्ही त्यांचे स्वागतच करू.

**- ज्ञानेश्वर (माऊली) औटी, सामाजिक कार्यकर्ते**

नगरसेवकांचा शेड उभारणीला विरोध नसून, मंजूर विकासकामाच्या जागेवर अतिक्रमण करून ते उभारण्यास त्यांचा आक्षेप आहे. याबाबत नगरपंचायत प्रशासनात विरोधी बाकावर बसणारे नगरसेवक अशोक फुलाजी चेडे, शालुबाई कांतीलाल ठाणगे,पै. युवराज पठारे, ज्ञानेश्वर बाळासाहेब औटी, नवनाथ तुकाराम सोबले, निताताई देवराम ठुबे यांसह राष्ट्रवादीचे शहर प्रमुख राजू दत्तात्रय औटी आणि राष्ट्रवादीचे उपशहरप्रमुख सुनील अरुण गाडगे यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. आपल्या अर्जात त्यांनी दशक्रिया घाटावरील सुरू असलेले अतिक्रमण तात्काळ हटविण्याची मागणी करत, संबंधित शेड दुसऱ्या योग्य जागेवर उभारण्यात यावे, अशी स्पष्ट भूमिका मांडली आहे.